शासन निर्णय GR



# कायदा काय सांगतो

शासन निर्णय व वनहक्क एक माहिती संच

# कायदा काय सांगतो

शासन निर्णय व वनहक्क एक माहिती संच

**इकोनेट**
फ्लॅट नं. २, गुलमोहर ओरीयन, एस.आर.पी.एफ. गेट नं १ जवळ,
सर्व्हे नं. ११०/अ/९, रामटेकडी रोड, हडपसर,
पुणे : ४११ ०१३, महाराष्ट्र.
फोन : (+९१) ७४२००२७७५५
इमेल : econet.pune@gmail.com वेबसाईट : www.econetindia.org

# ऋणनिर्देश

कायदा काय सांगतो या माहिती पुस्तिकेत वनहक्क कायद्याच्या अनुशंघाने उपलब्ध असणाऱ्या शासन निर्णय आणि सुधारित नियम तसेच इतर अवश्यक असणारे वेगवेगळे अर्ज नमुने यांचा एक संच समाविष्ट केलेला आहे. या पुस्तिकेत नमूद किंवा समाविष्ठ केलेली माहिती किंवा दस्तावेज हे शासकीय आहेत. यामध्ये दिलेले वेगवेगळे अर्ज नमुने हे सुद्धा शासनाच्या वेब साईट वरून घेण्यात आलेले आहे.

वाचकांना वनहक्क कायदा आणि त्यासंबंधित वेगवेगळे शासन निर्णय आणि अर्ज नमुने याबद्दलची माहिती होण्याच्या अनुशंघाने या पुस्तिकेला विशेष महत्व आहे.

वनहक्काची आणि त्यासंबंधित शासन निर्णय एकाच ठिकाणी वाचता यावे या उद्देशाने तळागाळात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना डोळ्यासमोर ठेवून या माहिती पुस्तिकेची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**इकोनेट,**
पुणे.

# अनुक्रमणिका


## १. शासन निर्णय

१. अनुसूचित जनजाती आणि इतर पारंपारिक वनवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६.

२. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक (वनहक्क मान्य करणे)

३. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक (वनहक्क मान्य करणे) नियम २००८.

४. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक (वनहक्क मान्य करणे) सुधारणा नियम २०१२.

## २. वन हक्क संबंधित अर्ज नमुने, आराखडे

१. वयक्तिक वनहक्क दावा

२. सामुहित वनहक्क दावा

३. नजरी नकाशा

४. ज्येष्ठ नागरिक कथन

५. ग्रामसभेची सूचना

६. सामुहित वनहक्क ग्रामसभा ठराव

७. वनहक्क पडताळणी सूचना

८. पडताळणी निष्कर्ष (अनुसूचित जमाती)

९. पडताळणी निष्कर्ष (इतर पारंपारिक वन निवासी)

१०. सामुहिक वनसंसाधन हक्क दावा

११. सामुहिक वनहक्कांचे संवर्धन आणि व्यवस्थापन आराखडा नमुना

भारत सरकार

**विविध व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६

**(सन २००७ चा अधिनियम क्रमांक २)**

(३० जून २०१६ रोजी यथाविद्यमान)

# The Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recogniation of Forest Rights) Act, 2006

**(Act No. 2 of 2007)**

*[As in force on the 30th June 2016]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२०१६

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३० जून २०१६ रोजी यथाविद्यमान असलेला दि शेड्यूल ट्राईब्ज अॅण्ड अदर ट्रेडिशनल फॉरेस्ट ड्वेलर्स (रेकग्निशन ऑफ फॉरेस्ट राईट्स) अॅक्ट, २००६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १७, अंक २, दिनांक २२ सप्टेंबर २०१६ यात पृष्ठे १३ ते २० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतीच्या प्राधिकाराने प्रकासित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ सप्टेंबर २०१६.

**डॉ. जी. नारायण राजू,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

The edition of the Schedule Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Right) Act, 2006 as on the 30th June 2016 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazettee of India, Extraordinary, Part XII, Section I, Vol. 17, No. 2 dated 22nd September 2016 on pages 13 to 20.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it become the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd September 2016.

**Dr. G. NARAYAN RAJU,**
Secretary to the Government of India.

# अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६

## कलमांचा क्रम

**कलमे**

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### वन हक्क

३. वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वनवासी यांचे वन हक्क.

### प्रकरण तीन

### वन हक्कांची मान्यता, त्यांचे पुनःस्थापन व ते निहित करणे व तत्संबंधित बाबी

४. वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांच्या वन हक्कांचा मान्यता देणे व ते निहित करणे.

५. वन हक्कधारकांची कर्तव्ये.

### प्रकरण चार

### वन हक्क विहित करण्यासाठी प्राधिकरणे व कार्यपद्धती

६. वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वनवासी यांचे वन हक्का निहित करण्यासाठी प्राधिकरणे आणि त्यांची कार्यपद्धती.

### प्रकरण पाच

### अपराध व शास्ती

७. या अधिनियमा अन्वये प्राधिकरणांचे व समित्यांचे सदस्य किंवा अधिकारी यांनी केलेले अपराध.

८. अपराधांची दखल.

### प्रकरण सहा

### संकीर्ण

९. प्राधिकरण, इत्यादीचे सदस्य लोकसेवक असणे.

१०. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

११. मध्यवर्ती अभिकरण.

१२. निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकारी.

१३. हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याला न्यूनता आणणार नाही.

१४. नियम करण्याचा अधिकार

## अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६

**(सन २००७ चा अधिनियम क्रमांक २)**

**(३० जून २०१६ रोजी यथाविद्यमान)**

**(२९ डिसेंबर, २००६)**

**जे पिढ्यानरिढ्या वनांमध्ये राहत आहेत परंतु ज्यांच्या हक्कांची नोंद होऊ शकलेली नाही अशा, वनवासी अनुसूचित जनजाती आणि इतर पारंपरिक वनवासी, यांच्या वन हक्कांना व वन जमिनीवरील त्यांच्या भोगवट्यास मान्यता देण्यासाठी आणि असे वन हक्क व भोगवटा त्यांच्याकडे निहित करण्यासाठी; अशा प्रकारे निहित केलेल्या वन हक्कांची नोंद करण्यासाठी मूलभूत कार्यपद्धतीची आणि वन जमिनींसंबंधातील अशा वन हक्कांच्या मान्यतेसाठी व त्यांच्या निहितीकरणासाठी आवश्यक असलेल्या पुराव्यांचे स्वरूप याकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** वनवासी अनुसूचित जनजाती आणि इतर पारंपरिक वनवासी यांच्या मान्यताप्राप्त हक्कांमध्ये, जैवविविधतेचा निरंतर वापर करणे, तिचे संधारण करणे आणि पारिस्थितीक समतोल राखणे यांबद्दलच्या जबाबदाऱ्या आणि प्राधिकार यांचा, आणि त्यांद्वारे वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांच्या उपजीविकेची आणि अन्न सुरक्षेची सुनिश्चिती करताना, वन संधारणाची पद्धत सक्षम करणे, यांचा समावेश होतो;

**आणि ज्याअर्थी,** वसाहती सरकारच्या राजवटीत तसेच स्वतंत्र भारतात, राज्य वनांचे एकत्रीकरण करताना, अनुसूचित जनजातींच्या व इतर पारंपरिक वनवासींच्या वडिलोपार्जित जमिनींवरील वन हक्कांना व त्यांच्या वसतिस्थानाला पर्याप्त मान्यता न दिल्यामुळे, वनसृष्टी टिकवून ठेवण्याशी आणि तिला सक्षम करण्याशी ज्यांचा घनिष्ट संबंध आहे, अशा वनवासी अनुसूचित जनजातींवर आणि इतर पारंपरिक वनवासींवर खरोखरच अन्याय झाला आहे;

**आणि ज्याअर्थी,** सरकारी विकास कामांमुळे ज्यांना आपल्या घरातून विस्थापित होण्यास भाग पाडण्यात आले होते अशा व्यक्तींसह, वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांचा धारणाधिकारविषयक आणि येण्याजाण्याचा वन हक्क मिळण्याबाबतची दीर्घकाळपासूनची अनिश्चितता दूर करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी,** तो भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :–

प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनिम, २००६ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतास लागू असेल.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, – **व्याख्या.**

(क) ''सामूहिक वन साधनसंपत्ती'' याचा अर्थ, गुरे चारणाऱ्या समुदायाच्या बाबतीत, त्या समुदायाला पारंपरिक प्रवेश देण्यात आला होता ती अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यांसारखी राखीव वने, संरक्षित वने व संरक्षित क्षेत्रे यांसह, गावाच्या किंवा भूक्षेत्राच्या हंगामी वापराच्या पारंपरिक किंवा रूढीगत सीमांमधील, रूढीगत सामाईक वनजमीन, असा आहे:

(ख) ''संरक्षित वन्य जीव वसतिस्थान'' याचा अर्थ, कलम ४ ची पोटकलमे (१) व (२) यांतून उद्भवणाऱ्या कार्यपद्धतीविषयक आवश्यकतांनुरूप क्षेत्रे निर्धारित करण्यासाठी केंद्र सरकारने स्थानिक क्षेत्रांतून नियुक्त केलेल्या तज्ज्ञांचा तसेच जनजाती कार्य मंत्रालयच्या प्रतिनिधीचा समावेश असलेल्या, तज्ज्ञ समितीने **खुल्या पद्धतीने विचारविनिमय केल्यानंतर, भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून निर्धारित** व अधिसूचित करण्यात येतील अशा वन्यजीव संवर्धनाच्या प्रयोजनांसाठी अशी क्षेत्रे अबाधित ठेवण्याची आवश्यकता आहे, या वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ निकषांच्या आधारे, प्रकरणनिहाय विशिष्ट रीतीने आणि स्पष्टपणे जी स्थापन करण्यात आलेली आहेत, अशी राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये यांची क्षेत्रे, असा आहे;

(ग) ''वनवासी अनुसूचित जनजाती'' याचा अर्थ, जे प्रामुख्याने वनात राहतात आणि जे उपजीविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वन जमिनींवर अवलंबून आहेत अशा अनुसूचित जनजातीतील व्यक्ती किंवा समूह, असा आहे आणि त्यामध्ये अनुसूचित जनजातीतील गुरे चारणाऱ्या समुदायाचा समावेश होतो;

(घ) ''वन जमीन'' याचा अर्थ, कोणत्याही वन क्षेत्रात येणारी कोणत्याही वर्णनाची जमीन, असा आहे, आणि त्यामध्ये वर्गीकरण न केलेली वने, सीमांकित न केलेली वने, विद्यमान किंवा मानीव वने, संरक्षित वने, राखीव वने, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यांचा समावेश होतो;

(ङ) ''वन हक्क'' याचा अर्थ, कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेले वन हक्क, असा आहे;

(च) ''वन गाव'' याचा अर्थ, वनीकरण कामांसाठी कोणत्याही राज्य शासनाच्या वन विभागाद्वारे ज्या वनांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या आहेत किंवा वन आरक्षण प्रक्रियेद्वारे ज्या वन गावांमध्ये रूपांतरित केलेल्या होत्या अशा वस्त्या, असा आहे, आणि त्यामध्ये वन वस्ती गावांचा, नियत हक्क मागणीच्या धारण जमिनींचा, अशा गावांसाठी कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या टांग्या–वस्त्यांचा समावेश होतो आणि त्यामध्ये लागवडीसाठी आणि शासनाने परवानगी दिलेल्या इतर वापरांसाठी असलेल्या जमिनींचाही समावेश होतो;

(छ) ''ग्रामसभा'' याचा अर्थ, गावातील सर्व प्रौढ सदस्यांची मिळून बनलेली आणि कोणत्याही पंचायती, पाडे, टोले व इतर पारंपरिक ग्राम संस्था आणि निर्वाचित ग्राम समित्या नसलेल्या राज्यांच्या बाबतीत, महिलांचा पूर्ण व अनिर्बंध सहभाग असलेली ग्रामसभा, असा आहे;

(ज) ''वसतिस्थान'' यामध्ये, आदिम जनजाती समूह व कृषि-पूर्व समुदाय आणि इतर वनवासी अनुसूचित जनजाती यांच्या रूढीगत वसतिस्थांचा आणि राखीव वने व संरक्षित वने यांमधील अशा इतर वसतिस्थानांचा समावेश असणाऱ्या क्षेत्राचा समावेश होतो;

(झ) 'गौण वनोत्पादन' यामध्ये बांबु, खुरटी झाडे, खोड, वेत, कोसा, रेशमी किड्यांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू किंवा केंदू पत्ता, औषधी वनस्पती आणि शाक, मुळे, कंद व त्यांच्यासारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनांचा समावेश होतो;

(ञ) ''मध्यवर्ती अभिकरण'' याचा अर्थ, कलम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेले मध्यवर्ती अभिकरण, असा आहे;

(ट) ''अधिसूचना'' याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे;

(ठ) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ड) ''अनुसूचित क्षेत्रे'' याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेली अनुसूचित क्षेत्रे, असा आहे;

(ढ) ''निरंतर वापर'' याला, जैव-विविधता अधिनियम, २००२ याच्या कलम २ च्या खंड **२००३ चा**
(ण) मध्ये २००३ चा जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल; **१८.**

(ण) ''इतर पारंपरिक वनवासी'' याचा अर्थ, १३ डिसेंबर २००५ पूर्वी जी किमान तीन पिढ्यांपासून प्रामुख्याने बनात राहत आहे आणि उपजीविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वन जमिनींवर अवलंबून आहे अशी कोणतीही व्यक्ती किंवा समुदाय, असा आहे.

**स्पष्टीकरण–** या खंडाच्या प्रयोजनार्थ, पिढी याचा अर्थ, पंचवीस वर्षांचा कालखंड, असा आहे;

(त) ''गाव'' याचा अर्थ, –

(एक) पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, **१९९६ चा**
१९९६ याच्या कलम ४ च्या खंड (ख) मध्ये निर्देशिलेले गाव; किंवा **४०.**

(दोन) अनुसूचित क्षेत्रांव्यतिरिक्त पंचायतीशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही राज्य कायद्यामध्ये गाव म्हणून निर्देशिलेले कोणतेही क्षेत्र; किवा

(तीन) वन गावे, जुनी वसतिस्थाने किंवा वसाहती आणि भूमापन न केलेली गावे,- मग ती गाव म्हणून अधिसूचित करण्यात आलेली असोत किंवा नसोत; किंवा

(चार) पंचायती नसलेल्या राज्यांच्या बाबतीत, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे पारंपरिक गाव, असा आहे;

(थ) ''वन्य प्राणी'' याचा अर्थ, वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ याच्या अनुसूची **१९७२ चा**
एक ते चार यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आणि निसर्गामध्ये वन्य स्वरूपात आढळणाऱ्या **५३.**
प्राण्यांच्या कोणत्याही प्रजाती, असा आहे;

प्रकरण दोन

**वन हक्क**

३. (१) जे वैयक्तिक किंवा सामूहिक किंवा दोन्ही धारणाधिकाराची सुनिश्चिती करतात असे पुढील हक्क हे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सर्व वन जमिनींवरील वनवासी अनुसूचित जनजातीचे व इतर पारंपरिक वनवासींचे वन हक्क असतील :– **वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांचे वन हक्क.**

(क) वनवासी अनुसूचित जनजातीच्या किंवा इतर पारंपरिक वनवासीच्या सदस्याने किंवा सदस्यांनी, वस्ती करण्यासाठी किंवा उपजीविकेकरिता स्वतः लागवड करण्यासाठी वैयक्तिक किंवा सामाईक भोगवट्याखाली वन जमीन धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क;

(ख) पूर्वीची संस्थाने, जमीनदारी किंवा अशा मध्यस्थ राजवटीमध्ये वापरात असलेल्या हक्कांसह कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे निस्तार यांसारखे सामूहिक हक्क;

(ग) गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमांबाहेर पारंपरिकपणे गोळा केली जाणारी गौण वनोत्पादने गोळा करण्यासाठी प्रवेश करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यांबद्दल स्वामित्व हक्क;

(घ) जलाशयांमध्ये मासेमारी करणे व इतर उत्पन्न घेणे, चराई करणे (प्रस्थापित वा तात्पुरती अशा दोन्ही स्वरूपाची) आणि भटक्या समाजांचा किंवा गुरे चारणाऱ्या समुदायाचा वनांमधील परंपरागत हंगामी प्रवेश यांसारखे वहिवाटीचे किंवा हक्कदारीचे इतर सामूहिक हक्क;

(ङ) आदिम जनजाती समूह आणि कृषिपूर्व समुदाय यांच्या वसतिस्थानांच्या किंवा वस्त्यांच्या सामूहिक धारणाधिकाराचा समावेश असणारे हक्क;

(च) जेथे हक्कांबाबत आक्षेप घेतले जातात अशा कोणत्याही राज्यात, कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या विवादास्पद जमिनीमधील किंवा जमिनींवरील हक्क;

(छ) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने किंवा कोणत्याही राज्य शासनाने वन जमिनींबाबत दिलेले पट्टे किंवा भाडेपट्टे किंवा इनाम यांचे मालकी हक्कांमध्ये रूपांतर करण्याचा हक्क;

(ज) सर्व वन गावे, जुनी वसतिस्थाने, भूमापन न केलेली गावे आणि वनांमधील अन्य गावे, – मग ती अभिलिखित, अधिसूचित केलेली असोत किंवा नसोत – यांमध्ये वसाहत करण्याचा व त्यांचे महसुली गावात रूपांतर करण्याचा हक्क;

(झ) निरंतर वापर करण्यासाठी पारंपरिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात येणाऱ्या कोणत्याही सामूहिक वन संपत्तीचे संरक्षण, पुनर्निर्माण किंवा संवर्धन करण्याचा अथवा व्यवस्थापन करण्याचा हक्क;

(ञ) कोणत्याही राज्य कायद्याअन्वये किंवा कोणतीही स्वायत्त जिल्हा परिषद किंवा स्वायत्त प्रादेशिक परिषद यांच्या कायद्यांअन्वये मान्यता दिलेले हक्क किंवा

कोणत्याही राज्याच्या संबंधित आदिवासींच्या कोणत्याही पारंपारिक किंवा रूढीगत कायद्याअन्वये आदिवासींचे हक्क म्हणून मान्य केलेले हक्क;

(ट) जैव-विविधता पाहण्याचा हक्क आणि जैव-विविधता व सांस्कृतिक विविधता यांच्याशी संबंधित असलेली बौद्धिक संपदा व पारंपरिक ज्ञान मिळविण्याचा सामूहिक हक्क;

(ठ) खंड (क) ते (ट) मध्ये नमूद न केलेले परंतु वन्य प्राण्यांच्या कोणत्याही प्रजातींची शिकार करण्याचा किंवा त्यांना सापळ्यात पकडण्याचा किंवा त्यांच्या शरीराचा भाग कापून घेण्याचा रूढीगत हक्क वगळून वनवासी अनुसूचित जनजाती किंवा, यथास्थिति, इतर पारंपरिक वनवासी यांच्याकडून उपभोगण्यात येत असलेला अन्य कोणताही पारंपरिक हक्क;

(ड) जेव्हा अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांना, १३ डिसेंबर २००५ पूर्वी, त्यांची पुनर्वसनाची वैध हक्कदारी डावलून कोणत्याही स्वरूपाच्या वन जमिनीतून अवैधरीत्या निष्कासित किंवा विस्थापित करण्यात आले असेल तेव्हा अशा प्रकरणी, त्यांचे पर्यायी जमिनीसह मूळ स्वरूपात पुनर्वसन करण्याचा हक्क;

(२) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार, **१९८० चा**
सरकारद्वारे व्यवस्था केलेल्या पुढील सुविधांकरिता वन जमिनी परिवर्तित करण्याची **६९.**
तरतूद करील, आणि त्यात दर हेक्टरी पंचाहत्तर वृक्षांपेक्षा अधिक नसतील इतके वृक्ष पाडता येतील :-

(क) शाळा;

(ख) दवाखाना किंवा रुग्णालय;

(ग) अंगणवाड्या;

(घ) रास्त धान्य दुकाने;

(ङ) विद्युत व दूरसंदेशवाहक तारमार्ग;

(च) तलाव किंवा अन्य गौण जलाशये;

(छ) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व जल वाहिन्या;

(ज) जल किंवा पर्जन्यजल संचय संरचना;

(झ) लहान सिंचन कालवे;

(ञ) अपारंपरिक ऊर्जा साधन;

(ट) कौशल्य विकास किंवा व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे;

(ठ) रस्ते; आणि

(ड) समाज वगैरे :

परंतु असे की, जर,-

(एक) या पोटकलमात नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी खुली करावयाची वन जमीन, प्रत्येक प्रकरणात एक हेक्टरपेक्षा कमी असेल तरच आणि

(दोन) अशा विकास प्रकल्पांचा निपटारा, ग्रामसभेने त्याबाबत शिफारस केलेल्या शर्तींच्या अधीन करण्यात येईल तरच,

केवळ वन जमिनी अशा प्रकारे परिवर्तित करण्यात येतील.

## प्रकरण तीन

## वन हक्कांची मान्यता, त्यांचे पुनःस्थापन व ते निहित करणे व तत्संबंधित बाबी

**वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांच्या वन हक्कांना मान्यता देणे व ते निहित करणे,**

४. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आणि या अधिनियमांच्या तरतुदींस अधीन राहून, केंद्र सरकार, याद्वारे, –

(क) कलम ३ मध्ये नमूद केलेल्या सर्व वन हक्कांच्या बाबतीत, अनुसूचित जनजाती म्हणून घोषित करण्यात आले आहे अशा राज्यातील किंवा राज्यांच्या क्षेत्रांतील वनवासी अनुसूचित जनजाती;

(ख) कलम ३ मध्ये नमूद केलेल्या सर्व वन हक्कांच्या बाबतीत, इतर पारंपरिक वनवासी, यांचे हक्क मान्य करीत आहे व ते त्यांना निहित करीत आहे;

(२) राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये यांतील संरक्षित वन्यजीव वसतिस्थानांमध्ये या अधिनियमाअन्वये मान्यता दिलेल्या वन हक्कांत नंतर बदल करता येतील किंवा ते पुनःप्रस्थापित करता येतील, परंतु, वन्य जीव संरक्षणासाठी अशी अबाधित क्षेत्रे निर्माण करण्याच्या प्रयोजनासांठी, पुढील सर्व शर्तींची पूर्तता झाल्याशिवाय वन हक्कधारकांचे पुनःप्रस्थापन करण्यात येणार नाही किंवा त्यांच्या हक्कांना कोणत्याही रीतीने बाधा पोहोचविण्यात येणार नाही, जसे,–

(क) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वन हक्कांना मान्यता देण्याची व ते निहित करण्याची प्रक्रिया, विचाराधीन असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये पूर्ण करणे;

(ख) वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, राज्य शासनाच्या संबंधित अभिकरणांद्वारे असे सिद्ध करण्यात येईल की, वन हक्कधारकांची कार्ये किंवा त्यांच्या उपस्थितीचा प्रभाव हे वन्य प्राण्यांची भरून न काढता येण्याजोगी हानी होण्यास आणि उक्त प्रजाती आणि त्यांची वसतिस्थाने धोक्यात येण्यास, पुरेसे आहे; **१९७२ चा ५३.**

(ग) सहजीवन यासारखे इतर वाजवी विकल्प उपलब्ध नाहीत असा निष्कर्ष राज्य शासनाने काढला आहे;

(घ) बाधित व्यक्ती व समुदाय यांच्याकरिता सुरक्षित उपजीविका पुरविण्यासाठी आणि केंद्र सरकारचे प्रस्तुत कायदे व धोरण यांत दिलेल्या, अशा बाधित व्यक्ती व समुदाय यांच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी पुनर्वसन किंवा पर्यायी योजना तयार करणे व ती संसूचित करणे;

(ङ) प्रस्तावित पुनर्वसाहत व योजना यांच्याशी संबंधित असलेल्या क्षेत्रांमध्ये ग्रामसभेची लेखी स्वरूपातील मुक्त संमती मिळविणे;

(च) वचन दिलेल्या योजनेप्रमाणे, पुनर्वसाहतीच्या ठिकाणी सुविधा पुरविल्याशिवाय व जमीन वाटप पूर्ण केल्याशिवाय पुनर्वसाहत करण्यात येणार नाही :

परंतु असे की, वन्यजीव संवर्धनाच्या प्रयोजनांसाठी ज्यामधून हक्कधारकांचे अशा रीतीने स्थानांतरण करण्यात आले असेल अशी संरक्षित वन्य जीव वसतिस्थाने, नंतर अन्य उपयोगांसाठी राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा इतर कोणत्याही संस्थेकडून परिवर्तित करण्यात येणार नाहीत.

(३) कोणत्याही राज्याच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील बनवासी अनुसूचित जनजाती किंवा इतर पारंपरिक वनवासी, १३ डिसेंबर २००५ पूर्वी वनजमिनीचा भोगवटा करीत होते या शर्तीस अधीन राहून, अशा वनवासी अनुसूचित जनजातींचे आणि इतर पारंपरिक वनवासींचे, या अधिनियमाअन्वये वन जमीन आणि त्यांचे वसतिस्थान यांबाबतचे वन हक्क मान्य करून ते त्यांना निहित करण्यात येतील.

(४) पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेला हक्क, वारसाप्राप्त (वंशपरंपरागत) असेल, मात्र तो, अन्यसंक्राम्य किंवा हस्तांतरणीय असणार नाही आणि त्याची नोंद, विवाहित व्यक्तींच्या बाबतीत, पती-पत्नी या दोघांच्या नावाने संयुक्तपणे, आणि एकच व्यक्ती कुटुंबप्रमुख असलेल्या कुटुंबाच्या बाबतीत, अशा एकाच व्यक्तीच्या नावाने करण्यात येईल आणि प्रत्यक्ष वारस नसेल त्याबाबतीत, असा वारसाहक्क जवळच्या नातेवाईकाकडे जाईल.

(५) अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, मान्यतेची व पडताळणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, वनवासी, अनुसूचित जनजाती किंवा इतर पारंपरिक वनवासी यांच्या कोणत्याही सदस्याला, त्याच्या भोगवटघातील वन जमिनीतून निष्कासित करण्यात येणार नाही किंवा काढून टाकण्यात येणार नाही.

(६) जेव्हा पोटकलम (१) द्वारे मान्य केलेले व निहित केलेले वन हक्क हे, कलम ३ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये नमूद केलेल्या जमिनीच्या संबंधातील असतील त्याबाबतीत, अशी जमीन, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, एखाद्या व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या किंवा समुदायाच्या भोगवट्याखाली असेल आणि ती प्रत्यक्ष भोगवट्याखाली असलेल्या क्षेत्रापुरती मर्यादित असेल आणि कोणत्याही परिस्थितीत, ती चार हेक्टरपेक्षा अधिक असणार नाही.

(७) या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेले बोजे व प्रक्रियात्मक आवश्यक यांपासून, तसेच वन **१९८० चा**
(संवर्धन) अधिनियम, १९८० अन्वये ना-हरकत, ''निव्वळ विद्यमान मूल्य'', प्रदान **६९.**
करण्याची आवश्यकता आणि वन जमिनीच्या अपवाहनाच्या बदल्यात करावयाचे ''हानिपूरक वनरोपण'', यांपासून मुक्त असे वन हक्क प्रदान करण्यात येतील.

(८) अधिनियमाअन्वये मान्यता दिलेल्या व निहित केलेल्या वन हक्कांमध्ये, सरकारी विकास कार्माच्या अडथळ्यांमुळे जमीनविषयक नुकसानभरपाई न देता, ज्यांना त्यांच्या निवासस्थानातून आणि लागवडीच्या जमिनीमधून विस्थापित करण्यात आले होते आणि ती जमीन ज्या प्रयोजनासाठी संपादित केली होती त्याच प्रयोजनासाठी उक्त संपादन केल्यापासून पाच वर्षांच्या आत, वापरण्यात आलेली नाही, हे सिद्ध करू शकणाऱ्या अशा वनवासी अनुसूचित जनजाती आणि इतर पारंपरिक वनवासी यांच्या जमीनविषयक हक्कांचा समावेश असेल.

५. या अधिनियमाअन्वये जेथे कोणत्याही वन हक्काचे धारक असतील अशा क्षेत्रांतील कोणत्याही वन हक्कांचे धारक, ग्रामसभा आणि गावपातळीवरील संस्था यांना, - **वन हक्कधारकांची कर्तव्ये.**

(क) वन्य जीव, वन्य आणि जैव-विविधता यांचे संरक्षण करण्याचा;

(ख) लगतची पाणलोट क्षेत्रे, जलस्वोत व इतर परिस्थीतीकीय संवेदनक्षम क्षेत्रे पुरेशी संरक्षित आहेत याची सुनिश्चिती करण्याचा;

(ग) वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांचे निवासस्थान, त्यांच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारशाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचेल अशा कोणत्याही प्रकारच्या विघातक प्रथांपासून सुरक्षित ठेवले असल्याची सुनिश्चिती करण्याचा;

(घ) सामुहिक वन संपत्तीतील प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी आणि वन्य प्राणी, वन व जैव- विविधता यांवर प्रतिकूल परिणाम करणारी कोणतीही कृती थांबविण्यासाठी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांचे अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती करण्याचा, अधिकार प्रदान केलेला आहे.

प्रकरण चार

## वन हक्क निहित करण्यासाठी प्राधिकरणे व कार्यपद्धती

६. (१) या अधिनियमाअन्वये ग्रामसभेच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आतील वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांना देण्यात येतील असे वैयक्तिक किंवा सामूहिक वन हक्क किंवा ते दोन्ही हक्क यांचे स्वरूप आणि त्यांची व्याप्ती ठरविण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी, त्यांच्याकडून हक्कमागण्या प्राप्त करून, त्या एकत्रित करून, त्यांची पडताळणी करून आणि अशा हक्कांचा वापर करण्यासाठी विहित केलेल्या रीतीने शिफारस केलेल्या प्रत्येक दाव्याचे क्षेत्र रेखांकित करणारा नकाशा तयार करणारे, ग्रामसभा एक प्राधिकरण असेल आणि त्यांनतर ग्रामसभा, तशा आशयाचा ठराव संमत करील आणि त्यानंतर त्याची एक प्रत उप-विभाग स्तरीय समितीकडे पाठवील. **वनवासी अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी यांचे वन हक्क निहित करण्यासाठी प्राधिकरणे आणि त्यांची कार्यपद्धती.**

(२) ग्रामसभेच्या निर्णयामुळे व्यचित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, पोटकलम (३) अन्वये घटित करण्यात आलेल्या उप-विभाग स्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करता येईल आणि उप-विभाग स्तरीय समिती अशा विनंती अर्जावर विचार करून तो निकालात काढील :

परंतु असे की, असा प्रत्येक विनंतीअर्ज, ग्रामसभेने ठराव संमत केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, व्यथित झालेल्या व्यक्तीला झालेल्या व्यक्तीला, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, असा कोणताही विनंतीअर्ज अशा व्यक्तीच्या विरुद्ध निकालात काढला जाणार नाही.

(३) राज्य शासन, ग्रामसभेने संमत केलेला ठराव तपासण्यासाठी उप-विभाग स्तरीय समिती घटित करील आणि वन हक्कांचे अभिलेख तयार करून तो, अंतिम निर्णयासाठी उपविभागीय अधिकाऱ्यामार्फत जिल्हास्तरीय समितीकडे पाठवील.

(४) उप-विभाग स्तरीय समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उप-विभाग स्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, जिल्हास्तरीय समितीकडे विनंतीअर्ज दाखल करता येईल आणि जिल्हास्तरीय समिती, अशा विनंतीअर्जावर विचार करून तो निकालात काढील :

परंतु असे की, उप-विभाग स्तरीय समितीकडे दाखल करण्यात आल्याखेरीज आणि तिने त्यावर विचार केला असल्याखेरीज, ग्रामसभेच्या ठरावाविरुद्ध कोणताही विनंती अर्ज, थेट जिल्हास्तरीय समितीपुढे दाखल करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, व्यथित झालेल्या व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, असा कोणताही विनंतीअर्ज, अशा व्यथित व्यक्तीच्या विरुद्ध निकालात काढला जाणार नाही.

(५) राज्य शासन, उप-विभाग स्तरीय समितीने तयार केलेल्या वन हक्कांच्या अभिलेखावर विचार करण्यासाठी व त्यास अंतिम मान्यता देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती घटित करील.

(६) वन हक्कांच्या अभिलेखावरील जिल्हास्तरीय समितीचा निर्णय, अंतिम व बंधनकारक असेल.

(७) राज्य शासन, वन हक्कांना मान्यता देण्याच्या व ते निहित करण्याच्या प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याकरिता आणि मध्यवर्ती अभिकरणाकडून मागणी करण्यात येतील अशी विवरणे व असे अहवाल, त्याला सादर करण्याकरिता, एक राज्यस्तरीय संनियंत्रण समिती घटित करील.

(८) उप-विभाग स्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समिती, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, राज्य शासनाच्या महसूल, वन व जनजाती कार्य विभागांतील अधिकारी आणि संबंधित पंचायत राज संस्था यांना नेमलेले समुचित स्तरावरील पंचायत राज संस्थांचे तीन सदस्य, त्यांपैकी दोन सदस्य हे अनुसूचित जनजातीतील असतील व त्यातील किमान एक सदस्य महिला असेल, यांची मिळून बनलेली असेल.

(९) उप-विभाग स्तरीय, जिल्हास्तरीय समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समिती यांची रचना व कामे आणि त्यांची कामे पार पाडताना त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती, ही विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

प्रकारण पाच

## अपराध व शास्ती

७. कोणतेही प्राधिकरण किंवा समिती किंवा अशा प्राधिकरणाचा किंवा समितीचा अधिकारी किंवा सदस्य, वन हक्कांच्या मान्यतेशी संबंधित असणाऱ्या या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदीचे उल्लंघन करीत असेल तर, ते प्राधिकरण, किंवा ती समिती किंवा ते अधिकारी किंवा सदस्य या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येतील आणि त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास आणि एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस ते पात्र ठरतील :

**या अधिनियमाअन्वये प्राधिकरणांचे व समित्यांचे सदस्य किंवा अधिकारी यांनी केलेले अपराध.**

परंतु असे की, या कलमात निर्देशिलेल्या प्राधिकरणाच्या किंवा समितीच्या कोणत्याही सदस्याने किंवा विभाग प्रमुखाने किंवा कोणत्याही व्यक्तीने, अपराध तिच्या किंवा त्यांच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून त्याने/तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, तो सदस्य किंवा विभागप्रमुख किंवा ती व्यक्ती, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

**अपराधांची दखल.**

८. ग्रामसभेच्या ठरावाशी संबंधित असणाऱ्या विवादाच्या प्रकरणात, कोणत्याही वनवासी अनुसूचित जनजातीने किंवा ग्रामसभेने ठरावाद्वारे, कोणत्याही उच्चतर प्राधिकरणाच्या विरोधात, राज्यस्तरीय संनियंत्रण समितीला साठ दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीची नोटीस दिल्याशिवाय आणि राज्यस्तरीय संनियंत्रण समितीने, अशा प्राधिकरणाच्या विरोधात कार्यवाही केल्याशिवाय, कोणतेही न्यायालय, कलम ७ खालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

**प्राधिकरण, इत्यादींचे सदस्य लोकसेवक असणे, १८६० चा**

९. प्रकरण चारमध्ये निर्देशिलेल्या प्राधिकरणांचा प्रत्येक सदस्य आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करणारा अन्य प्रत्येक अधिकारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थातर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस**

१०. (१) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, केंद्र सरकारच्या, किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा अन्य कर्मचाऱ्यांविरुद्ध संरक्षण, कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल, केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या विरोधात, कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमाअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, प्रकरण चारमध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही प्राधिकरणाविरुद्ध तसेच त्याची अध्यक्षपदीय व्यक्ती, त्याचे सदस्य, सदस्य-सचिव, अधिकारी व अन्य कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**मध्यवर्ती अभिकरण.**

११. जनजाती कार्याशी संबंधित काम करणारे केंद्र सरकारचे मंत्रालय किंवा याबाबतीत केंद्र सरकारने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण हे, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता मध्यवर्ती अभिकरण असेल.

**निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार**

१२. प्रकरण चारमध्ये निर्देशिलेले प्रत्येक प्राधिकरण, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये आपली कर्तव्ये पार पाडीत असताना व आपल्या अधिकारांचा वापर करीत असताना, केंद्र सरकार, वेळोवेळी लेखी स्वरूपात देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांना अधीन असेल.

१३. या अधिनियमात आणि पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ याच्या तरतुदीमध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमातील तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना न्यूनता न आणता त्यात भर टाकणाऱ्या असतील. **हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याला न्यूनता आणणार नाही.**

१४. (१) केंद्र सरकारला, अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषतःआणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमां-मध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल:-

(क) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीच्या अंमलबजावणीचा प्रक्रियात्मक तपशील:

(ख) हक्क मागण्या प्राप्त करणे, त्या एकत्रित करणे व त्यांची पडताळणी करणे आणि कलम ६च्या पोटकलम (१) अन्वये असलेल्या वन हक्कांचा वापर करण्या-करिता शिफारस केलेल्या प्रत्येक हक्क मागणीचे क्षेत्र रेखांकित करणारा नकाशा तयार करणे याबद्दलची कार्यपद्धती आणि त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये उप विभागीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करण्याची रीत :

(ग) कलम ६ च्या पोटकलम (८) अन्वये उप-विभाग स्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती आणि राज्यस्तरीय संनियंत्रण समिती यांचे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या, राज्य शासनाच्या महसूल, वन व जनजाती कार्य विभागांच्या अधिकाऱ्यांच्या स्तर;

(घ) कलम ६ च्या पोटकलम (९) अन्वये उप-विभाग स्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती आणि राज्यस्तरीय संनियंत्रण समिती यांची रचना व कामे आणि त्यांची कामे पार पाडताना त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ङ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतेही बाब;

(३) या अधिनियमाअन्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर एका सत्राने अथवा क्रमवर्ती दोन किंवा अधिक सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता, ते सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि जर उपरोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या लागोपाठचे सत्र समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले असेल अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमाअन्वये यापूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**के. एन. चतुर्वेदी**
**भारत सरका**

**The Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006**

**अनुसूचित जनजाती व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६**

## इंग्रजी – मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| community tenure | सामूहिक धारणाधिकार | [8. 3(1)] |
| compensatory afforestation. | हानिपूरक वनरोपण | [S. 4(7) |
| critical wildlife habitat | संरक्षित वन्य जीव वसतिस्थान | [S. 2(b)] |
| customary habitat | रूढीगत वसतिस्थान | (8. 2(b)] |
| ecological sensitive areas. | पारिस्थितीकीय संवेदनक्षम क्षेत्रे | [S. 5(b)] |
| intellectual property | बौद्धिक संपदा | [S. 3(1)(k)] |
| intermediary regimes | मध्यस्थ राजवट | [S. 3(1)(b)] |
| legal entitlement | वैध हक्कदारी | [S. 3(1)(m)] |
| nodal agency | मध्यवर्ती अभिकरण | [S. 2(j)] |
| pastoral community | गुरे चारणारा समुदाय | [S. 2(a)] |
| primitive tribal groups | आदिम जनजाती समूह | [S. 2(h)] |
| resettlement | पुनर्वसाहत | [S. 4(2)(e)] |
| secure livelihood | सुरक्षित उपजीविका | [S. 4(2)(d)] |
| sustainable use | निरंतर वापर | [S. 2(n)] |

## मराठी – इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| आदिम जनजाती समूह | primitive tribal groups | [क. २ (ज)] |
| गुरे चारणारा समुदाय | pastoral community | [क. २ (क)] |
| निरंतर वापर | sustainable use | [क. २ (ढ)] |
| पारिस्थितीकीय संवेदनक्षम क्षेत्रे | ecological sensitive areas. | [क. ५ (ख)] |
| पुनर्वसाहत | resettlement | [क. ४(२) (ङ)] |
| बौद्धिक संपदा | intellectual property | [क. ३(१) (ट)] |
| मध्यवर्ती अभिकरण | nodal agency | [क. २ (ञ)] |
| मध्यस्थ राजवट | intermediary regimes | [क. ३(१) (ख)] |
| रूढीगत वसतिस्थान | customary habitat | [क. २ (ज)] |
| वैध हक्कदारी | legal entitlement | [क. ३(१) (ड)] |
| सामूहिक धारणाधिकार | community tenure | [क. ३ (१)] |
| सुरक्षित उपजीविका | secure livelihood | [क. ४(२) (घ)] |
| संरक्षित वन्य जीव वसतिस्थान | critical wildlife habitat | [क. २ (ख)] |
| हानिपूरक बनरोपण | compensatory afforestation | [क. ४ (७)] |

# भारत सरकार

## जमाती कार्य मंत्रालय

## अधिसूचना

**नवी दिल्ली, १ जानेवारी, २००८**

## अधिसूचना

जी. एस. आर.------------- (ई) : ज्याअर्थी, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे, भारत सरकारच्या जमाती कार्य मंत्रालयाची अधिसूचना क्र. जीएसआर ४३७ (ई), दिनांक १९ जून, २००७ याच्या कलम १४ च्या पोटकलम (१) अन्वये त्याच दिनांकाच्या, भारताचे राजपत्र, भाग-दोन, कलम ३, पोट-कलम (एक) मध्ये, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००७ याचा मसुदा प्रसिध्द करण्यात आला होता. आणि यामुळे बाधीत होऊ शकतील अशा सर्व व्यक्तींकडून उक्त अधिसूचनेचा अंतर्भाव असलेल्या राजपत्राच्या प्रती जनतेस उपलब्ध करुन दिल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवस पूर्ण होण्यापूर्वी, हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, उक्त राजपत्राच्या प्रती जनतेला २५.०६.२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, उक्त नियमांच्या मसूदयाच्या संबंधातील जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना, केंद्र सरकारद्वारे विचारात घेण्यात आल्या आहेत;

त्याअर्थी, आता, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) यांचे कलम १४, पोटकलम (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, केंद्र सरकार, याद्वारे, अशा वनभूमीवर राहणाऱ्या वन निवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांच्या वन भूमीवरील वन हक्क व व्यवसाय यांस मान्यता देण्यासाठी व ते निहित करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :-

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ,

(१) या नियमांना अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००७ असे म्हणावे.

(२) यांचा विस्तार जम्मू व काश्मिर वगळून संपूर्ण भारतभर असेल.

(३) हे नियम शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. व्याख्या :-

(१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,

(क) ''अधिनियम'' याचा अर्थ, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६, (२००७ चा २), असा आहे.

(ख) ''उपजीविकेच्या वास्तविक गरजा'' याचा अर्थ या अधिनियमाच्या कलम ३ याच्या पोटकलम (१) च्या खंड (क) (ग) आणि (घ) अन्वये तरतूद केल्यानुसार वनभूमीच्या स्वयंलागवडीतून उत्पादनांची निर्मिती किंवा विक्री यांद्वारे स्वतःच्या व कुटुंबाच्या कायम स्वरुपी गरजांची परिपूर्ती, असा आहे.

(ग) ''मागणीदार'' याचा अर्थ अधिनियमात सूचीबध्द करण्यात आलेल्या कोणत्याही हक्कास मान्यता देण्यासाठी व ते निहित करण्यासाठी मागणी करणारी व्यक्ती, व्यक्तींचा गट, कुटुंब किंवा समूह असा आहे.

(घ) या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, 'गौण वनोत्पादनांची विल्हेवाट'' यामध्ये, उपजीविकेसाठी एकत्र येणारे किंवा समूह यांनी अशा उत्पादनाच्या वापराकरिता किंवा विक्रीकरिता, स्थानिक पातळीवरील प्रक्रिया, मूल्यवर्धन, डोक्यावरुन, सायकलवरुन व हातगाडीवरुन वनक्षेत्रामध्ये वाहून नेणे यांचा समावेश आहे.

(डः) ''वनहक्क समिती'' याचा अर्थ नियम ३ अन्वये ग्रामसभेद्वारे गठित करण्यात आलेली समिती, असा आहे.

(च) ''कलम'' याचा अर्थ अधिनियमाचे कलम, असा आहे.

(२) या अधिनियमात व्याख्या केलेल्या परंतु या नियमांत व्याख्या करण्यात न आलेल्या शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात जे अर्थ नेमून दिले असतील, ते ते अर्थ असतील.

३. ग्रामसभा,

(१) ग्रामसभा ही ग्रामपंचायतीद्वारे आमंत्रित करण्यात येईल आणि तिच्या पहिल्या सभेत, ती तिच्या सदस्यांमधून दहापेक्षा कमी नसतील परंतु पंधरापेक्षा जास्त नसतील अशा सदस्यांना वन हक्क समितीचे सदस्य म्हणून निवडून देईल. त्या समितीमध्ये किमान एक तृतीयांश सदस्य अनुसूचित जमातीचे असतील.

परंतु, अशा सदस्यांपैकी एक तृतीयांश पेक्षा कमी नसतील एवढे सदस्य महिला असतील.

परंतु आणखी असे की, अनुसूचित जमातीचे सदस्यच नसतील तर, अशा सदस्यांपैकी किमान एक तृतीयांश सदस्य महिला असतील.

(२) ''वन हक्क समिती'' अध्यक्ष व सचिव यांच्याबाबत निर्णय घेईल व तो उप-विभागस्तरीय समितीला कळवील.

(३) वन हक्क समितीचा सदस्य हा जेव्हा व्यक्तिगत वन हक्काचाही मागणीदार असेल तेव्हा तो समितीला त्याबाबत कळवील आणि त्याचा दावा विचारात घेण्यात येत असेल त्यावेळी तो पडताळणीच्या प्रक्रियेत सहभागी होणार नाही.

४. ग्रामसभेची कार्ये, ग्रामसभा,

१. (क) वन हक्कांचे स्वरुप व व्याप्ती निर्धारित करण्याची प्रक्रिया सुरु करील आणि त्याच्यासंबंधित दावे प्राप्त करुन त्यांची सुनावणी करील.

(ख) वनहक्कांच्या मागणीदारांची यादी तयार करील व मागणीदार व त्यांचे दावे यांच्या केंद्र सरकारने आदेशाद्वारे निर्धारित केलेल्या अशा तपशीलाचा अंतर्भाव असलेली नोंदवही ठेवील.

(ग) हितसंबंधी व्यक्ती व संबंधित प्राधिकरण यांना वाजवी संधी दिल्यानंतर, वन हक्कांच्या मागण्यांचा निर्णय संमत करीत व तो उपविभागस्तरीय समितीकडे अग्रेषित करील.

(घ) अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) याच्या खंड (डः) अन्वये पुनर्वसाहतींची पॅकेजेस विचारात घेईल व यथोचित निर्णय संमत करील; आणि

(ङ:) अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदी अंमलात आणण्याच्या दृष्टीने, वन्यजीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी, तिच्या सदस्यांमधून समिती गठीत करील.

(२) अशा ग्रामसभेच्या सर्व सदस्यांच्या दोन-तृतीयांश पेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यसंख्येने ग्रामसभेच्या बैठकीची गणपूर्ती होईल.

परंतु, कोणत्याही गावात, अनुसूचित जमाती व अनुसूचित जमातीवर यांची बहुजिनसी लोकसंख्या असेल तर, अनुसूचित जमाती, आदिम जमाती गट व कृषिक-पूर्व समाज यांचे सदस्य पुरेशा प्रमाणात प्रतिनिधित्व करतील.

(३) ग्रामसभांना राज्यातील प्राधिकरणांद्वारे आवश्यक ते सहाय्य पुरविण्यात येईल.

५. उपविभागस्तरीय समिती राज्य शासन, पुढील सदस्यांची मिळून, उपविभागस्तरीय समिती गठीत करील.

(क) उपविभागीय अधिकारी किंवा समतुल्य अधिकारी - अध्यक्ष

(ख) उपविभागाचा प्रभारी वन अधिकारी किंवा समतुल्या अधिकारी सदस्य

(ग) जिल्हा पंचायतीकडून नामनिर्देशित करावयाचे गट/तहसील पातळीवरील पंचायतींचे तीन सदस्य, ज्यांच्यापैकी किमान दोन सदस्य हे, प्राधान्यतः जे वन निवासी किंवा जे आदिम जमाती समूहांमधील आहेत, असे अनुसूचित जमातीचे असतील आणि जेथे अनुसूचित जमातीचे सदस्य नसतील तेथे, ते प्राधान्यतः इतर पारंपरिक वन निवासींपैकीचे दोन सदस्य असतील व त्यातील किमान एक महिला सदस्य असेल किंवा संविधानाच्या सहाव्या अनुसूचीत अंतर्भूत असलेल्या क्षेत्रांमध्ये स्वायत्त जिल्हा परिषद/प्रादेशिक परिषद किंवा इतर समुचित क्षेत्र स्तर यांच्याद्वारे नामनिर्देशन केलेले तीन सदस्य असतील ज्यापैकी किमान एक महिला सदस्य असेल; आणि

(घ) उपविभागाचा प्रभारी असलेला, आदिवासी विकास विभागाचा अधिकारी, किंवा जेथे असा अधिकारी उपलब्ध नसेल तेथे आदिवासी कार्याचा प्रभारी अधिकारी.

६. **<u>उप विभागस्तरीय समित्यांची कार्ये :</u>** उपविभागस्तरीय समिती -

(क) प्रत्येक ग्रामसभेला, त्यांची कर्तव्ये आणि वन्यजीवन, वन व ज्याचे संवर्धन व सरंक्षण करणे गरजेचे आहे अशा संकटग्रस्त वनस्पती व प्राणीजात यांच्या संदर्भातील जैविक विविधतेचे सरंक्षण करणे याबाबत वन हक्कांची व इतरांची कर्तव्ये यांची माहिति पुरवील.

(ख) ग्रामसभा किंवा वनहक्क समिती यांना वन व महसूल नकाशे व मतदार यादी पुरवील;

(ग) संबंधित ग्रामसभांच्या सर्व निर्णयांची पडताळणी करील.

(घ) ग्रामसभेद्वारे पुरविण्यात आलेले नकाशे व तपशील एकत्रित करील.

(ङ:) दाव्यांच्या खरेपणाची खात्री करुन घेण्यासाठी ग्रामसभेच्या निर्णयांची व नकाशांची तपासणी करील.

(च) वन हक्कांचे स्वरुप व त्याचा विस्तार याविषयी ग्रामसभांमधील विवादांची सुनावणी करील व अभिनिर्णय देईल.

(छ) ग्रामसभेच्या निर्णयांनी व्यथित झालेल्या व्यक्तीने व राज्य अभिकरणांनी केलेल्या विनंतीअर्जाची सुनावणी करील.

(ज) आंतरउपविभागीय दाव्यांकरिता इतर उप-विभागस्तरीय समित्यांशी समन्वय साधील.

(झ) शासकीय अभिलेखाशी मेळ साधल्यानंतर प्रस्तावित वन हक्कांचा गट किंवा तहसीलनिहाय अभिलेखाचा मसुदा तयार करील.

(ञ) उपविभागीय अधिकाऱ्यांद्वारे, प्रस्तावित वन हक्काच्या अभिलेखाच्या मसुदयासह, दावे, अंतिम निर्णयासाठी, जिल्हास्तरीय समितीकडे पाठवील.

(ट) अधिनियम व नियमा अन्वये घालून दिलेली उद्दिष्टे, व पध्दती याविषयी वन निवासींत जागृती निर्माण करील.

(ठ) या नियमांच्या जोडपत्र–एक (नमुना क व ख) मधील तरतुदींनुसार, मागणीदाराच्या दाव्यांची प्रपत्रे सहजगत्या व मोफत उपलब्ध होतील याविषयी सुनिश्चिती करील.

(ड) ग्रामसभेच्या बैठका आवश्यक त्या गणपूर्तीसह, मुक्त, खुल्या वातावरणात व चांगल्या रीतीने आयोजित करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करील.

७. **जिल्हास्तरीय समिती.** राज्य शासन पुढील सदस्यांची मिळून जिल्हास्तरीय समिती गठीत करील.

(क) जिल्हाधिकारी किंवा उप–आयुक्त– अध्यक्ष

(ख) संबंधित विभागीय वन अधिकारी किंवा संबंधित उप वनसंरक्षक– सदस्य

(ग) जिल्हा पंचायतीद्वारे नामनिर्देशन करावयाचे जिल्हा पंचायतीचे तीन सदस्य, ज्यापैकी, दोन, सदस्य हे जे प्राधान्यतः वन निवासी किंवा आदिम जमाती गटांमधील अनुसचित जमातीचे असतील, व जेथे अनुसूचित जमाती नसतील तेथे जे प्राधान्यतः इतर पारंपरिक वन निवासी आहेत व त्यातील किमान एक महिला सदस्य असेल असे दोन सदस्य; किंवा संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेल्या क्षेत्रांमध्ये, स्वायत्त जिल्हा परिषद/प्रादेशिक परिषद यांनी नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य, ज्यांपैकी किमान एक महिला सदस्य असेल,

(घ) जिल्हयाचा प्रभारी असलेला आदिवासी कल्याण विभागाचा अधिकारी किंवा असा अधिकारी उपलब्ध नसल्यास, आदिवासी कार्यांचा प्रभारी असलेला अधिकारी.

८. **जिल्हास्तरीय समितीची कार्ये:**

(१) जिल्हास्तरीय समिति, –

(क) नियम ६, खंड (ख) अन्वये, ग्राम सभेला किंवा वन हक्क समितीला आवश्यक माहिति पुरविण्यात आली आहे याची खात्री करील

(ख) सर्व हक्कमागण्या, विशेषतः आदिम आदिवासी समूह, फिरते आदिवासी आणि भटक्या जमाती यांच्या, अधिनियमाची उद्दिष्टे ध्यानात ठेवून संबोधित करण्यात आल्या आहेत किवा कसे याची तपासणी करील.

(ग) उप–विभागस्तरीय समितीद्वारे तयार करण्यात आलेल्या वन हक्कांच्या हक्कमागण्या व अभिलेख विचारात घेईल व त्यास अंतिम मान्यता देईल.

(घ) उप–विभागस्तरीय समितीच्या आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तींकडून आलेल्या विनंती अर्जाची सुनावणी करील.

(ङ) आंतर जिल्हा हक्कमागण्या संबंधात इतर जिल्हयांसह समन्वय साधेल

(च) हक्कांविषयीच्या अभिलेखांसह सर्व संबंधित शासकीय अभिलेखांमध्ये वन हक्कांचा समावेश करण्यासकरिता निदेश देईल.

(छ) अंतिम रुप देण्यात आलेल्या वन हक्कांचे अभिलेख प्रसिध्दी करण्यात आल्याची खात्री करील.

(ज) या नियमांच्या जोडपत्र दोन व तीन मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार या अधिनियमान्वये वन हक्कांच्या व मालकी हक्कांच्या अभिलेखाची प्रमाणित प्रती, अनुक्रमे संबंधित मागणीकाराला आणि त्या त्या ग्रामसभेला पुरविण्याची खात्री करील.

९. **राज्यस्तरीय संनियंत्रण समिती :–** राज्य शासन, पुढील सदस्यांची मिळून राज्यस्तरीय संनियंत्रण समिती घटित करील –

(क) मुख्य सचिव अध्यक्ष;

(ख) सचिव, महसूल विभाग सदस्य;

(ग) सचिव, आदिवासी विकास किंवा समाज कल्याण विभाग सदस्य;

(घ) सचिव, वन विभाग सदस्य;

(च) प्रधान मुख्य वन संरक्षक सदस्य;

(ङ) सचिव, पंचायत राज सदस्य;

(छ) जमाती सल्लागार परिषदेच्या अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित करावयाचे जमाती सल्लागार परिषदेचे तीन अनुसूचित जमाती सदस्य आणि जेथे जमाती सल्लागार परिषद नसेल तेथे राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित करावयाचे तीन अनुसूचित जमाती सदस्य;

(ज) आयुक्त, आदिवासी कल्याण किंवा समतुल्य असा सदस्य सचिव.

१०. **राज्यस्तरीय संनियंत्रण समितीची कार्ये :–** राज्यस्तरीय संनियंत्रण समिती --

(क) वन हक्कांना मान्यता देणे व ते निहित करणे या प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याचे निकष व निर्देशक तयार करील.

(ख) वन हक्कांना मान्यता देणे, त्यांची पडताळणी करणे व ते राज्यात निहित करणे यांच्या प्रक्रियेवर संनियंत्रण करील;

(ग) वन हक्कांना मान्यता देणे, त्यांची पडताळणी करणे व ते निहित करणे यांच्या प्रक्रियेचा सहामाही अहवाल सादर करील व मुख्य अभिकरणाद्वारे मागविण्यात येतील अशी विवरणपत्रे व अहवाल मुख्य अभिकरणाला सादर करील;

(घ) या अधिनियमाच्या कलम ८ मध्ये नमूद केल्यानुसार कोणतीही अशी नोटीस प्राप्त झाल्यावर, अधिनियमा अन्वये, अशा प्राधिकरणांविरुध्द यथोचित कृती करील.

(ङ) अधिनियमाच्या कलम ४ पोट–कलम (२) अन्वये पुर्नवसाहतीकरणावर संनियंत्रण करील.

११. **ग्रामसभेद्वारे हक्कमागण्या दाखल करणे, त्या निर्धारित करणे व त्यांची पडताळणी करणे याची कार्यपध्दती:–**

(१) ग्राम सभा,--

(क) हक्क मागण्या मागवील आणि अशा हक्क मागण्या य नियमांच्या परिशिष्ट–एक मध्ये तरतूद केलेल्या नमुन्यात स्वीकारण्यासाठी वन हक्क समितीला प्राधिकृत करील व अशा हक्कमागण्या, त्या मागवल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत, नियम १३ मध्ये नमूद केलेल्या किमान दोन पुराव्यासह स्विकाराव्यात.

परंतु असे की, ग्राम सभा, आवश्यक वाटल्यास, त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करुन हा तीन महिन्यांचा कालावधी वाढवू शकेल.

(ख) तिच्या सामूहिक वनसंपत्तीची निश्चिती करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात करण्यासाठी, दिनांक निश्चित करील व तो लागू असलेल्या ग्राम सभांना कळवील आणि ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात परस्परव्याप्ती झाली असेल त्या ठिकाणी उप-विभाग स्तरीय समितीला कळवील.

(२) वन हक्क समिती, ग्राम सभेला तिच्या पुढील कार्यामध्ये सहाय्य करील, ---

(एक) विनिर्दिष्ट स्वरुपातील हक्क मागण्या आणि अशा हक्कमागण्यांच्या पुष्ट्यर्थ पुरावा स्वीकारणे, त्याची पोच देणे व तो जतन करणे;

(दोन) हक्कमागण्या व प१ुरावे, तसेच नकाशे यांचा अभिलेख तयार करणे;

(तीन) वन हक्कांवर दावा सांगणाऱ्या मागणीदारांची यादी तयार करणे;

(चार) या नियमात तरतूद केलेल्या हक्कमागण्यांची पडताळणी करणे;

(पाच) ग्राम सभेपुढे, तिच्या विचारार्थ हक्कमागणीचे स्वरुप व व्याप्ती याबाबतचे त्यांचे निष्कर्ष सादर करणे.

(३) प्राप्त झालेल्या प्रत्येक हक्क मागणीची वन हक्क समितीकडून यथोचितरीत्या लेखी पोच देण्यात येईल.

(४) वन हक्क समिती, सामुहिक वन हक्कांकरिता, ग्राम सभेच्या वतीने या नियमांच्या जोडपत्र एक मधील नमुना ख मध्ये हक्कमागण्या तयार करील.

(५) ग्राम सभा, पोट-नियम (२) च्या खंड (पाच) खालील निष्कर्ष प्राप्त झाल्यावर, वन हक्क समितीच्या निष्कर्षांवर विचार करण्याकरिता पूर्व सूचना देऊन बैठक बोलावील, यथोचित ठराव संमत करुन तो उप विभाग स्तरीय समितीकडे पाठवील.

(६) ग्राम पंचायतीचा सचिव त्याची कर्तव्ये पार पाडताना ग्राम सभेचा सचिव म्हणूनही काम पाहील.

१२. **<u>वन हक्क समितीकडून दाव्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया :-</u>**

(१) वन हक्क समिती, संबंधित मागणीदारास व वन विभागास योग्य सूचना दिल्यानंतर -

(क) जागेला भेट देईल व जागेवरच दाव्याचे स्वरुप, व्याप्ती व पुरावा यांची प्रत्यक्ष पडताळणी करील आणि

(ख) मागणीदार व साक्षीदारांनी सादर केलेला आणखी कोणताही पुरावा किंवा अभिलेख स्वीकारील.

(ग) फिरते आदिवासी व भटक्या जमाती, एकतर वैयक्तिक सदस्यांमार्फत, सामूहिकरीत्या किंवा पारंपरिक सामूहिक संस्थेद्वारे, त्यांच्या हक्कांच्या निर्धारित करण्याकरिता केलेल्या हक्कमागणीची, जेव्हा अशी व्यक्ती, समूह किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर असतील, तेव्हा पडताळणी करण्यात आली असल्याची खात्री करील.

(घ) आदिम आदिवासी गट किंवा कृषि-पूर्व समूह यांच्या सदस्यांनी मग एकतर त्यांच्या समूहाद्वारे असो किंवा पारंपरिक समूह संस्थेद्वारे असो, त्यांच्या वसतिस्थानाचा हक्क निर्धारित करण्याकरिता केलेल्या मागणीहक्काची, असे समूह किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर असताना पडताळणी करण्यात आली, असल्याची खात्री करील.

(ङ) ओळखता येण्याजोगी सीमा चिन्हे दर्शवून, प्रत्येक हक्क मागणीच्या क्षेत्राचा सीमांकन नकाशा तयार करील.

(२) वन हक्क समिती, त्यानंतर हक्क मागणीवरील तिचे निष्कर्ष नोंदवील आणि ग्राम सभेपुढे ते विचारार्थ सादर करील.

(३) जर दुसऱ्या गावाच्या परंपरागत किंवा रुढीगत हद्दींच्या बाबतीत परस्परविरोधी हक्क मागण्या असतील किंवा जर वन क्षेत्राचा वापर, एकापेक्षा अधिक ग्राम सभांकडून केला जात असेल, तर, संबंधित ग्राम सभांच्या वन हक्क समित्या अशा हक्क मागण्यांच्या उपभोगाच्या स्वरुपाबर विचार करण्यासाठी एकत्र बैठक घेतील आणि संबंधित ग्राम सभांना त्यातील निष्कर्ष लेखी सादर करतील;

परंतु असे की, जर ग्राम सभेला परस्परविरोधी हक्क मागण्यांबाबत निर्णय घेता आला नाही तर, निर्णयाकरिता त्या उप-विभाग स्तरीय समितीकडे निर्देशित करण्यात येतील.

(४) ग्राम सभा किंवा वन हक्क समिती यांनी माहिती, अभिलेख वा दस्तऐवज मिळण्यासाठी लेखी विनंती केल्यावर संबंधित अधिकारी त्याची अधिप्रमाणित प्रत ग्राम सभेकडे किंवा यथास्थिति, वन हक्क समितीकडे पाठवील आणि आवश्यक असल्यास, अधिकृत अधिकाऱ्याद्वारे त्याचा अर्थ सुकर करण्यात येईल.

१३. **<u>वन हक्क निश्चित करण्यासाठी पुरावा :-</u>**

(१) वन हक्कांना मान्यता देण्यासाठी व ते निहित करण्यासाठी इतर गोष्टींबरोबर पुढील गोष्टी अंतर्भूत असतील--

(क) सार्वजनिक दस्तऐवज, राजपत्रे, जनगणना, सर्वेक्षण व समझोता अहवाल, नकाशे, उपग्रहीय चित्रे, कार्य योजना, व्यवस्थापन योजना, सूक्ष्म योजना, वन चौकशी अहवाल, इतर वन अभिलेख, पट्टा किंवा भाडेपट्टा यांपैकी कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या हक्कांचा अभिलेख यासारखे शासकीय अभिलेख, समित्या किंवा आयोगांचे शासनाने घटित केलेल्या अहवाल, शासकीय आदेश, अधिसूचना, परिपत्रके, ठराव;

(ख) मतदार ओळखपत्र, शिधावाटप पत्रिका, पासपोर्ट, घरपट्टीच्या पोच पावत्या, अधिवास प्रमाणपत्रे यासारखे शासनाने प्राधिकृत केलेले दस्तऐवज.

(ग) घर झोपडया व जमिनीवर केलेल्या स्थायी सुधारणा, जसे, समतलन, बांध बांधणे, रोधी बांध व तत्सम इतर भौतिक गुणविशेष;

(घ) न्यायालयीन आदेश व न्याय निर्णय यांचा समावेश असेलेले न्यायिकवत व न्यायिक अभिलेख;

(ङ) कोणत्याही वनहक्कांचा उपभोग दर्शविणाऱ्या आणि रुढिगत कायद्याचे बळ असणाऱ्या रुढींचा व परंपरांचा भारतीय मानववंशशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेसारख्या नामांकित संस्थेने केलेला संशोधनात्मक अभ्यास व लेखांकन;

(च) भूतपूर्व प्रांतिक राज्य किंवा प्रांत किंवा अशा इतर मध्यस्थ संस्थांकडून मिळालेला कोणताही अभिलेख. यात नकाशे, हक्कनोंदी, विशेषाधिकार, सूट, अनुग्रह यांचा अंतर्भाव असेल;

(छ) प्राचीनत्व सिध्द करणाऱ्या, विहिरी, दफनभूमि, पवित्र स्थळे यांसारख्या पारंपारिक रचना,

(ज) पूर्वीच्या भूमि अभिलेखात नमूद केलेली व्यक्तीच्या पूर्वजांचा माग काढणारी किंवा पूर्वीच्या काळी त्या गावातील कायदेशीर रहिवासी असल्याची ओळख पटविणारी वंशावळ;

(झ) मागणीदारा खेरीज अन्य वडीलधाऱ्या माणसाचे लेखानिविष्ट कथन

(२) सामूहिक वन हक्कांच्या पुराव्यात इतर गोष्टींबरोबर पुढील बाबींचा अंतर्भाव असेल :-

(क) सामूहिक हक्क जसे, निस्तार– मग ते कोणत्याही नावाने संबोधले जात असोत;

(ख) पारंपारिक चराई मैदाने, मुळे व कंद, वैरण, वन्य खाद्यफळे व इतर गौण वनोत्पादने, मच्छिमार क्षेत्रे, सिंचन व्यवस्था, मनुष्य किंवा पशुंच्या वापरासाठी पाण्याचे स्त्रोत, औषधी वनस्पती गोळा करणाऱ्या वनस्पती व्यवसार्यीचे भूप्रदेश;

(ग) स्थानिक समूहाने बांधलेल्या रचनेचे अवशेष, पवित्र झाडे, देवराई, तळी किंवा नदीक्षेत्रे, दफ्फन किंवा दहनभूमि,

(३) ग्राम सभा, उप विभाग स्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय समिती, वन हक्क निर्धारित करताना वर नमूद केलेल्या बाबींपैकी एकाहून अधिक बाबी विचारात घेतील.

१४. **<u>उपविभागस्तरीय समितीकडे केलेले विनंतीअर्ज :–</u>**

(१) ग्रामसभेच्या निर्णयाने पीडित झालेली कोणतीही व्यक्ती ग्रामसभेने निर्णय दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, उपविभागस्तरीय समिती यांच्याकडे विनंतीअर्ज सादर करील.

(२) उपविभागस्तरीय समिती सुनावणीचा दिनांक निश्चित करील आणि विनंतीअर्जदारास व संबंधित ग्रामसभेस सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या किमान पंधरा दिवस आधी लेखी तसेच विनंतीअर्जदाराच्या गावातील सोयीस्कर असलेल्या सार्वजनिक ठिकाणी नोटीस लावून त्याबाबत कळवील.

(३) उपविभागस्तरीय समिती ––

विनंतीअर्ज दाखल करुन घेईल किंवा तो फेटाळील, किंवा तो विनंती अर्ज संबंधित ग्रामसभेकडे पुनर्विचारार्थ पाठवील.

(४) संदर्भात प्रकरण प्राप्त झाल्यावर तीस दिवसांच्या कालावधीच्या आंत ग्रामसभा प्रकरणाचा ठराव संमत करील व उपविभागीय स्तरीय समितीकडे अग्रेषित करील.

(५) उपविभागीय स्तरीय समिती, ग्रामसभेचा ठराव विचारात घेईल व तो विनंती अर्ज स्वीकारल्याचा किंवा फेटाळल्याचा सुमुचित आदेश संमत करील.

(६) प्रलंबित विनंतीअर्जाना बाध न आणता, उपविभाग स्तरीय समिती, अन्य मागणीदारांच्या वन हक्कविषयक अभिलेख तपासून व पडताळून पाहील आणि तो संबंधित उपविभागीय अधिकाऱ्याद्वारे जिल्हास्तरीय समितीला सादर करील.

(७) दोन किंवा त्याहून अधिक ग्रामसभांमध्ये विवाद झाल्यास कोणत्याही एका ग्रामसभेने किंवा उपविभाग स्तरीय समितीने स्वतः केलेल्या अर्जावरुन उपविभागस्तरीय समिती, विवाद सोडविण्याच्या दृष्टीने, संबंधित ग्रामसभांची संयुक्त सभा बोलवील आणि तीस दिवसांच्या कालावधीत त्यातून परस्पर सामंजस्याने कोणताही मार्ग काढता न आल्यास, संबंधित ग्रामसभांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर विवादावर निर्णय घेईल आणि त्यावर समुचित आदेश देईल.

१५. **<u>जिल्हास्तरीय समित्यांना विनंती अर्ज करणे :–</u>**

(१) उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयाने बाधित झालेली कोणतीही व्यक्ती, उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, जिल्हास्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करील.

(२) जिल्हास्तरीय समिती, विनंती अर्जावरील सुनावणीसाठी दिनांक निश्चित करील आणि त्याबाबत विनंती अर्जदारास, व संबंधित उपविभाग स्तरीय समितीस लेखी कळवील, तसेच सुनावणीसाठी निश्चित

केलेल्या दिनांकाच्या किमान पंधरा दिवस अगोदर विनंती अर्जदाराच्या गावातील सोईस्कर सार्वजनिक ठिकाणी या बाबतची नोटीस लावून कळवील.

(३) जिल्हास्तरीय समितीला एकतर, विनंतीअर्जास मान्यता देता येईल किंवा तो फ्रेटाळता येईल किंवा तो पुनर्निर्णयार्थ संबंधित उपविभागस्तरीय समितीकडे पाठवता येईल.

(४) असा संदर्भित विनंतीअर्ज मिळाल्यावर, उप विभागस्तरीय समिती विनंती अर्जदाराचे आणि ग्राम सभेचे म्हणणे ऐकून घेईल आणि त्यावर निर्णय घेईल आणि त्याबाबत जिल्हास्तरीय समितीला कळवील.

(५) त्यानंतर जिल्हास्तरीय समिती, विनंतीअर्ज विचारात घेईल आणि त्यावर विनंतीअर्ज स्वीकारल्याचा व फ्रेटाळल्याचा समुचित आदेश देईल.

(६) जिल्हास्तरीय समिती मागणीदाराच्या वा मागणीदारांच्या वन हक्कांचे अभिलेख जिल्हाधिकारी किंवा जिल्हा आयुक्त यांच्याकडे शासनाच्या अभिलेखांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी पाठवील.

(७) दोन किंवा त्यापेक्षा अधिक उपविभाग स्तरीय समित्यांच्या आदेशांमध्ये विसंगती असल्यास, जिल्हास्तरीय समिती स्वतःच संबंधित उपविभाग स्तरीय समित्यांमधील विसंगतींचा मेळ घालण्याच्या दृष्टीने त्यांची संयुक्त सभा बोलवील आणि जर यातून कोणताही परस्पर संमत मार्ग काढाता न आल्यास, जिल्हास्तरीय समिती, संबंधित उपविभाग स्तरीय समित्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर विवाद अभिनिर्णित करील आणि समुचित आदेश देईल.

(फा.क्र.१७०१४/०२/२००७–
पीसी व व्ही खंड – सात)
डॉ. बचित्तर सिंग, सह सचिव

**भारत सरकार**

**जमाती कार्य मंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८**

**जोडपत्र–एक**

**(पहा नियम ६ (झ))**

**नमुना–क**

**वन जमिनींच्या हक्कांसाठीच्या दाव्याचा नमुना**

**(पहा नियम ११ (१) (क))**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मागीदाराचे नाव | : | |
| २ | पतीचे/पत्नीचे नाव | : | |
| ३ | आईचे/वडिलांचे नाव | : | |
| ४ | पत्ता | : | |
| ५ | गाव | : | |
| ६ | ग्रामपंचायत | : | |
| ७ | तहसील/तालुका | : | |
| ८ | जिल्हा | : | |
| ९ | (क) अनुसूचित जमाती असल्याचे अधिकृत पुरावे. | : | होय/नाही |
| | (ख) पारंपरिक वन निवासी असल्याचे (जर पती/पत्नी अनुसूचित जमातीचे असल्यास (अधिकृत पुराव्याची प्रत जोडावी)) | : | होय/नाही |
| १० | कुटुंबातील अन्य सदस्यांची नाव वयासह (अवलंबून असणारी मुले व प्रौढ व्यक्ती यांच्यासह) | : | |

## जमिनीवरील दाव्याचे स्वरुप :

| | | |
|---|---|---|
| १ | ताब्यात असलेल्या वन जमिनीची व्याप्ती | : |
| | (क) वसतिस्थान | |
| | (ख) स्वतः कसण्यासाठी काही असल्यास<br>(पहा अधिनियमाचे कलम ३(१) (क)) | |
| २ | विवादाग्रस्त जमिनी, काही असल्यास,<br>(पहा अधिनियमाचे कलम ३(१) (च)) | : |
| ३ | पट्टा/भाडेपट्टा/अनुदान, काही असल्यास<br>(पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (छ) | : |
| ४ | मूळ स्वरुपात पुनर्वसनासाठी जमीन किंवा पर्यायी जमीन काही असल्यास<br>(पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ड)) | : |
| ५ | जमिनीच्या नुकसानभरपाईशिवाय जेथून विस्थापित झाले आहेत ती जमीन<br>(पहा अधिनियमाचे कलम ४ (८)) | : |
| ६ | वन गावातील जमिनींची व्याप्ती काही असल्यास<br>(पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ज) | : |
| ७ | अन्य कोणतेही पारंपरिक हक्क, काही असल्यास<br>(पहा अधिनियमाचे कलम ३(१) (झ)) | : |
| ८ | पृष्ठ्यर्थ पुरावा : (पहा नियम १३) | : |
| ९ | कोणतीही अन्य माहिती | : |

**मागणीदाराची (मागणीदारांची)**
**स्वाक्षरी/अंगठयाचा ठसा १४**

**भारत सरकार**

**जमाती कार्य मंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८**

**नमुना – ख**

**सामूहिक हक्कासाठीच्या दाव्याचा नमुना**

**(पहा नियम ११ (१) (क) व (४))**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मागणीदाराचे / मागणीदारांचे नांव | : | |
| | क. वन निवासी अनुसूचित जमातीचा समूह | : | होय/नाही. |
| | ख. इतर जमाती वन निवासींचा समूह | : | होय/नाही. |
| २ | गाव | : | |
| ३ | ग्रामपंचायत | : | |
| ४ | तहसील / तालुका | : | |
| ५ | जिल्हा | : | |

**लाभ घेतलेल्या सामूहिक हक्कांचे स्वरुप**

१ निस्तार यासारखे सामुहिक हक्क, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ख)) :

२ गौण वनोत्पादनावरील हक्क, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३(१) (ग)) :

३ सामूहिक हक्क

क. वापर किंवा हक्कदारी असलेले (मासे, जलनिकाय), काही असल्यास,

ख. चराई, काही असल्यास

ग. भटके व फिरते आदिवासी यांच्याकरिता पारंपरिक साधनांचीसुगमता, काही असल्यास

(पहा अधिनियमाचे कलम ३(१) (छ))

४ पीटीजी व कृषक-पूर्व समूहांसाठी वसतिस्थान व वस्ती यांची सामूहिक भूधारणा पध्दती, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३(१) (ड.) :

५ जैविक विविधता, बौध्दिक संपत्ती व पारंपारिक ज्ञान यांच्या हक्कांची सुगमता, काही असल्यास, (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ट)) :

६ अन्य पारंपरिक हक्क, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (झ) :

७ पृष्ठ्यर्थ पुरावा : (पहा नियम १३) :

८ कोणतीही अन्य माहिती :

**मागणीदाराची/मागणीदारांची**
**सही / अंगठयाचा ठसा :**

**भारत सरकार**

**जमाती कार्य मंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८**

**जोडपत्र – दोन**

**(पहा नियम (८ )(ज))**

**ताब्यात असलेल्या वनजमिनीचा मालकी हक्क**

| | | |
|---|---|---|
| १ | वन हक्क धारकांचे नाव/नावे (पती/पत्नीसह) | : |
| २ | आई/वडिलांचे नांवे | : |
| ३ | अवलंबून असणाऱ्यांची नांवे | : |
| ४ | पत्ता | : |
| ५ | गाव/ग्रामसभा | : |
| ६ | ग्राम पंचायत | : |
| ७ | तहसील/तालुका | : |
| ८ | जिल्हा | : |
| ९ | अनुसूचित जमाती आहे की/इतर पारंपारिक वन निवासी आहे | : |
| १० | क्षेत्र | : |
| ११ | खासरा/खंड क्र यांच्यासह ठळक सीमाचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन | : |
| | हे हक्क वंशपरंपरागत आहेत परंतु अधिनियमांच्या कलम ४च्या पोटकलम (४) अन्वये अन्यसंक्राम्य किंवा हस्तांतरणीय नाहीत. | : |

आम्ही खालील सही करणार, याद्वारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्या वतीने, वरील वनहक्क कायम करण्यासाठी, सही करीत आहोत.

**विभागीय वन अधिकारी/उपवनसंरक्षक** **जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी**

**जिल्हाधिकारी/उपायुक्त.**

**भारत सरकार**

**जमाती कार्य मंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८**

**जोडपत्र – तीन**

**(पहा नियम ८ (ज))**

| | | |
|---|---|---|
| १ | सामुहिक वनहक्कधारकाचे नाव/धारकांची नावे | : |
| २ | गाव/ग्रामसभा | : |
| ३ | ग्रामपंचायत | : |
| ४ | तहसील/तालुका | : |
| ५ | जिल्हा | : |
| ६ | अनुसूचित जमाती आहे की / इतर पारंपरिक वन निवासी आहे | : |
| ७ | सामूहिक हक्कांचे स्वरुप | : |
| ८ | शर्ती काही असल्यास | : |
| ९ | रुढीप्राप्त सीमांसह / किंवा खासरा/खंड क्र यासह ठळक सीमाचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन | : |

## सामूहिक वन हक्क धारकाचे नाव (धारकांची नांवे)

१.

२.

३.

आम्ही खालील सही करणारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्या वतीने, सामूहिकवनहक्कांच्या उपरोल्लिखित धारकांना शीर्षकात उल्लेखिल्याप्रमाणे वनहक्क कायम करण्यासाठी आमच्या स्वाक्षऱ्या करीत आहोत.

**विभागीय वन अधिकारी/उपवनसंरक्षक** **जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी**

**जिल्हाधिकारी/उपायुक्त.**

**भारत सरकार**

**जमाती कार्य मंत्रालय**

**अधिसूचना**

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर, २०१२**

जी. एस. आर. ६६९ (अ) ज्या अर्थी भारत जनजाती कार्य मंत्रालयाची अधिसूचना क्र. जीएसआर ५७८ (ङ), दि. १९ जुलै, २०१२ याच्या त्याच दिनांकाच्या, भारताचे राजपत्र, भाग-दोन, कलम ३, पोट कलम (एक) द्वारे, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम २००६ (२००७ चा २) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) सुधारणा नियम, २०१२ चा मसुदा प्रसिध्द करुन त्याद्वारे बाथा पोचण्याची संभव असलेल्या सर्व व्यक्तींकडून उक्त अधिसूचनेचा अंतर्भाव असलेल्या राजपत्राच्या प्रती जनतेस उपलब्ध होण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त होण्याच्या आत, हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, उक्त राजपत्राच्या प्रती जनतेला २० जुलै, २०१२ रोजी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, उक्त सुधारित नियमांच्या मसुदयाच्या संबंधातील जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना, केंद्राद्वारे यथोचितरित्या विचारात घेण्यात आल्या आहेत.

त्याअर्थी, आता अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) यांचे कलम १४, पोटकलम (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याद्वारे वननिवासी अनूसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम २००८ यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, जसे,

१. (१) या नियमांना अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) सुधारणा नियम, २०१२ असे म्हणावे.

(२) ते शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम २००८ (यात यापुढे ज्याचा निर्देश नियम असा करण्यात आला आहे.) याच्या नियम २ चे उप नियम (१) मध्ये-

(एक) खंड (ख) च्या ऐवजी खालील खंडाचा समावेश करण्यात आला आहे -

''(ख) ''उपजीविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजा'' याचा अर्थ या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही हक्कांचा वापर करुन स्वतःच्या अथवा कुटुंबाच्या उपजीविकेच्या गरजा पूर्ण करणे असा आहे आणि यामध्ये अशा हक्कांच्या वापरातून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त उत्पादनांचा समावेश असेल, असा आहे.''

(दोन) खंड (ग) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

(गक) ''सामूहिक हक्क'' याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोटकलम १ च्या खंड (ख), (ग), (घ), (ङ), (ज), (झ), (ञ), (ट) आणि (ठ) यांमध्ये सूचीबध्द केलेले अधिकार असा आहे.

(तीन) खंड (घ) ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येईल.

''(घ) या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, ''गौण वनोत्पादनांची विल्हेवाटी'' मध्ये त्यांची विक्री करण्याच्या तसेच त्यांवर वैयक्तिक किंवा सामुहिक प्रक्रिया करण्याच्या, त्यांची साठवण करण्याच्या, त्यांचे मूल्यवर्धन करण्याच्या, त्यांची वनक्षेत्राच्या आत व बाहेर समुचित वाहतुकीच्या साधनाने अशा उत्पादनांचा वापर करण्यासाठी किंवा ती गोळा करुन किंवा उपजीविकेसाठी त्यांची सहकारी संस्था किंवा संघ किंवा महासंघ यामार्फत विक्री करण्यासाठी वाहतूक करण्याच्या हक्काचा समावेश असेल.''

**स्पष्टीकरण** (१) नियम ४ पोटनियम १ खंड (ङ) अन्वये गठित केलेली समिती अथवा ग्रामसभेने प्राधिकृत व्यक्ती यांच्याद्वारे गौण वनोत्पादनांच्या वाहतुकीसंबंधात पारगमन परवाना पध्दतीत फेरबदल येतील व तो देण्यात येईल.

२) पारगमन परवाने देण्याच्या कार्यपध्दतीविषयक आवश्यकता कोणत्याही प्रकारे गौण वनोत्पादनांच्या विल्हेवाटीबाबतचे हक्क निर्बंधित अथवा संकोचित करणार नाहीत.

(३) गौण वनोत्पादनांचे संकलन हे सर्व प्रकारचे स्वामित्वधन अथवा शुल्क अथवा इतर कोणत्याही प्रकारचे आकार यांपासून मुक्त असेल.

३. उक्त नियमांमध्ये नियम २ नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात येईल.

२क. वाडी/पाडे किंवा वसाहती निश्चित करणे आणि त्यांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया राज्य शासन सुनिश्चित करेल की,

(क) प्रत्येक पंचायत तिच्या हद्दीतील महसुली अथवा वनग्राम अभिलेखांचा औपचारिकरित्या भाग नाहीत अशा वाडी/पाडे, वस्त्या, नोंद न झालेल्या अथवा सर्वेक्षण न झालेल्या वसाहती किंवा वनग्राम गावे किंवा टांग्या गावे यांची यादी तयार करील आणि अशी यादी अशा प्रत्येक वस्त्या, वाडी/पाडे किंवा वसाहती यांची ग्रामसभा आयोजित करुन संमत करुन घेईल आणि पंचायतीच्या ठरावाद्वारे सदर अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अशा वाडी/पाडे, वस्त्या गाव म्हणून समावेश करण्यात येईल व अशी यादी उपविभाग स्तरीय समितीस सादर करील.

(ख) उपविभाग स्तरीय समितीचे उपविभागीय अधिकारी हे सध्या कोणत्याही गावाचा भाग नसलेल्या मात्र ठरावाद्वारे पंचायतीमधील गाव म्हणून समावेश केलेल्या वाडया/पाडे आणि वस्त्या यांच्या यादया एकत्रित करतील आणि विद्यमान गावामध्ये असे गाव म्हणून समाविष्ट करुन किंवा राज्याच्या या संबंधीतील कायदयातील प्रक्रिया अनुसरुन त्या तयार करतील आणि जनतेच्या काही सूचना असल्यास, त्या विचारात घेऊन जिल्हास्तरीय समिती अशा यादया अंतिम करील.

(ग) अशा वाड्या/पाड्या आणि वस्त्या यांच्या यादया अंतिम झाल्यानंतर यापूर्वीच मान्यता मिळालेल्या कोणत्याही हक्कांना बाधा न अशा चाडया/पाडे आणि वस्त्या यांना मान्यता देण्याचे व त्यांच्यात हक्क निहित करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येईल.

४. **उक्त नियम ३ मध्ये**

(क) उपनियम (१) मधील ''किमान एक-तृतीयांश सदस्य अनुसूचित जमातीचे असतील.'' या शब्दांऐवजी ''किमान दोन-तृतीयांश सदस्य अनुसूचित जमातीचे असतील'' याचा समावेश करण्यात यावा.

(ख) उपनियम (३) नंतर खालील उपनियम समाविष्ट करण्यात यावा.

''(४) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) सुधारित नियम, २०१२ अंमलात येण्यापूर्वी मान्य केलेले वनहक्क किंवा सुरु केलेल्या दाव्यांच्या पडताळणीची प्रक्रिया यावर वनहक्क समिती पुन्हा नव्याने विचार करणार नाही.''

५. उक्त नियमाच्या नियम ४ मध्ये :-

(एक) खंड (ङ) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल.

''(च) अनुसूचित जमातीचे वननिवासी व इतर पारंपारिक वननिवासी यांच्या फायदयासाठी अशा सामूहिक वनसंपत्तीचे निरंतर व समसमान व्यवस्थापन करण्यासाठी सामूहिक वनसंपत्तीचे संवर्धन करण्याची व तिचे व्यवस्थापन करण्याची योजना तयार करण्याऱ्या आणि वनविभागाच्या सूक्ष्म योजना किंवा चालू योजना किंवा व्यवस्थापन योजनांबरोबर अशा संवर्धन व व्यवस्थापन योजनांचे, समितीला करणे आवश्यक वाटेल अशा फेरबदलांनिशी एकत्रीकरण करणाऱ्या खंड (ङ) खाली गठित करण्यात आलेल्या समितीचे संनियंत्रक व नियंत्रण करणे.'

(छ) वाहतूक परवाना, उत्पादनांच्या विक्रीपासूनचे उत्पन्न किंवा व्यवस्थापन आराखडयात बदल करण्याशी संबंधित सर्व निर्णयांना मान्यता देणे.

(दोन) उपनियम (२) ऐवजी खालील उपनियम समाविष्ट करण्यात येईलः-

''(२) ग्रामसभेच्या बैठकीची गणपूर्ती ग्रामसभेच्या सर्व सदस्य संख्येच्या अर्ध्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्य संख्येने होईल परंतू, उपस्थित सदस्यांच्या किमान एक तृतीयांश इतक्या महिला असतील.

परंतु आणखी असे की, जेथे वनहक्कांसंबंधी कोणतेही निर्णय संमत करावयाचे असल्यास किमान पन्नास टक्के इतक्या वनहक्कांची मागणी करणारे दावेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असतील.

परंतू असेही की, असे निर्णय उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या व्यक्तींच्या साध्या बहूमताने संमत करण्यात येतील.

६. **उक्त नियमांच्या नियम ६ मधील खंड (ठ) ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येईल.**

''(ठ) या नियमांच्या जोडपत्र एक (नमुना क, ख आणि ग) मध्ये दिलेल्या दाव्यांची प्रपत्रे दावेदारांना सहज आणि चिनामूल्य उपलब्ध होतील याची खातरजमा करण्यात येईल.

७. **उक्त नियमांच्या नियम ८ मध्ये**

(एक) खंड (छ) मध्ये ''आणि'' हा शब्द वगळण्यात येईल.

(दोन) खंड (ज) मध्ये शेवटी ''आणि'' हा शब्द समाविष्ट करण्यात येईल.

(तीन) खंड (ज) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल.

''(झ) या नियमांच्या जोडपत्र-चार मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे या अधिनियमान्वये सामुहिक बनसाधनसंपत्तीचे हक्क व मालकी हक्क यांच्या अभिलेखांच्या प्रमाणित प्रत संबंधित ग्रामसभेला किंवा कलम ३ च्या पोटकलम १ च्या खंड (ठ) अन्वये ज्या समूहाला सामूहिक वनसंपत्तीचे हक्क देण्यास मान्यता देण्यात आली आहे अशा समूहाला देण्यात आल्याची खातरजमा करण्यात येईल.''

८. उक्त नियमाच्या नियम १० मध्ये

(एक) खंड (ग) ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येईल.

''(ग) वनहक्क मान्य करणे, त्यांची पडताळणी करणे आणि ते निहित करणे यांचे प्रक्रियेचे संनियत्रंण करण्यासाठी ३ महिन्यातून किमान एकदा बैठक घेण्यात येईल, क्षेत्रीय स्तरावरील समस्यांचा विचार आणि निराकरण करण्यासाठी आणि या नियमांच्या जोडपत्र-पाच ला जोडलेल्या नमुन्यात दाव्यांची स्थिती, या अधिनियमा अन्वये मान्य केलेल्या दाव्यांचा तपशील, त्यापैकी कोणते फेटाळण्यात आली असल्यास त्यांचे कारणे आणि प्रलंबित दाव्यांची स्थिती निश्चित झाल्यावर यांचा केंद्रसरकारला तिमाही अहवाल सादर करण्यात येईल.''

(दोन) खंड (ङ) नंतर खालील खंड दाखल करण्यात येईल.

''(च) कलम ३ च्या पोटकलम (१) च्या खंड (ड) आणि कलम ४ च्या पोटकलम (८) मधील तरतुदींच्या अनुपालनाचे विनिर्दिष्टपणे संनियंत्रण ठेवण्यात येईल.''

९. **उक्त नियमांमधील नियम ११, उपनियम (४) मधील** ''नमुना ख मधील सामुहिक वनहक्क'' या मजकुराऐवजी ''नमुना ख मधील सामुहिक वनहक्क आणि नमुना ग मधील कलम ३ च्या पोटकलम (१) च्या खंड (झ) अन्वये सामूहिक संपत्तीवरील हक्क'' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१०. **उक्त नियमांच्या नियम १२ च्या खंड (ङ) नंतर उपनियम (एक) मध्ये खालील खंड समाविष्ट करण्यात येईल.**

(च) ज्येष्ठ नागरिक ज्यांना अशा सीमा आणि परंपरागत प्रवेशाबाबत चांगली माहिती आहे अशा ज्येष्ठ व्यक्तींसह ग्रामसभेच्या इतर सदस्यांबरोबर सामूहिक वन साधनसंपत्तीच्या परंपरागत सीमा निश्चित करण्यात येतील.

(छ) ओळखू येणाऱ्या सीमा चिन्हांसह सामूहिक वनसंपत्तीचा नकाशा तयार करण्यात येईल आणि नियम १३ च्या उपनियम २ मध्ये नमूद केलेल्या सबळ पुराव्यांद्वारे आणि त्यानंतर असे सामुहिक वन संपत्तीचे दावे ग्रामसभेच्या साध्या बहुमताने ठराव संमत करुन करण्यात येतील.

**स्पष्टीकरण:** सामूहिक वन संपत्तीच्या सीमांकनामध्ये यांसारख्या सध्या अस्तित्वात असलेल्या वैध सीमा राखीव वन, संरक्षित वन, राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये यांचा समावेश असे आणि अशा सीमांकनामुळे समुहाच्या सामूहिक वनसाधनसंपत्ती वापर, संवर्धन आणि निरंतर वापर याबाबतच्या अधिकारांना निश्चित स्वरुप व मान्यता देण्यात येईल.

११. **उक्त नियमांच्या नियम १२ नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात येईल.**

**''१२ क. वनहक्क दावे मान्य करण्याची प्रक्रिया**

(१) वनहक्क समितीकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर वन आणि महसूल विभागाचे अधिकारी दाव्यांच्या पडताळणी दरम्यान आणि पुराव्यांच्या पडताळणी दरम्यान त्याठिकाणी उपस्थित राहतील आणि कार्यवृत्तावर त्यांचे पदनाम, दिनांक व अभिप्राय असल्यास त्यांसह स्वाक्षरी करतील.''

(२) ग्रामसभेने मान्य केलेल्या दाव्यांबाबत वन किंवा महसूल विभागाने, क्षेत्रीय पडताळणी दरम्यान त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित होते असा आक्षेप घेतल्यास असा दावा समितीद्वारे, ज्याठिकाणी आक्षेप घेण्यात आला आहे त्याठिकाणच्या ग्रामसभेकडे पुनर्पडताळणीसाठी पुन्हा पाठविण्यात येईल. आणि पडताळणी प्रक्रियेस प्रतिनिधीने पुन्हा उपस्थित राहण्यात कसूर केल्यास क्षेत्रीय पडताळणीबाबतचा ग्रामसभेचा निर्णय अंतिम राहील.

(३) ग्रामसभेने दाव्यांमध्ये फेरबदल अथवा ते फेटाळण्यात आल्यास किंवा उपविभाग स्तरीय समितीद्वारे जिल्हास्तरीय समितीस अग्रेषित केलेल्या दाव्यांमध्ये फेरबदल करण्याची किंवा ते फेटाळण्याची शिफारस करण्यात आल्यास, दाव्यांवरील असा निर्णय किंवा शिफारस केल्या प्रकरणी असा निर्णय अथवा शिफारस, यथास्थिती उपविभागीय समिती अथवा जिल्हास्तरीय समितीकडे दाद मागणे शक्य व्हावे यासाठी दावेदारास व्यक्तीशः साठ दिवसांच्या कालावधीच्या आत, जो उपरोक्त समित्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार तीस दिवसांपर्यंत वाढविता येईल, त्याबाबत दावेदारास कळविण्यात येईल.

(४) अन्य कोणत्याही राज्यभिकरणास अथवा उपविभाग स्तरीय समितीच्या निर्णयास आक्षेप घ्यावयाचा असल्यास ते यथास्थिती उपविभाग स्तरीय समिती अथवा जिल्हास्तरीय समितीपुढे अपिल दाखल करील, त्यावर दावेदारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर (संबंधित अभिकरणाचा प्रतिनिधीचा अनुपस्थितीत, असल्यास) समिती त्यावर निर्णय देईल.

(५) बाधित व्यक्तीला त्याच्या दाव्याच्या संबंधात कोणतीही बाब सादर करण्यासाठी वाजवी संधी दिल्याखेरीज त्याचे अपिल निकाली काढता येणार नाही.

(६) ग्रामसभेचा निर्णय अथवा शिफारस अपूर्ण असल्याचे अथवा प्रथम दर्शनी जास्तीची तपासणी करणे आवश्यक आहे असे आढळल्यास उपविभाग स्तरीय समिती अथवा जिल्हा स्तरीय समिती अशा दाव्यात फेरबदल करण्याऐवजी किंवा तो फेटाळण्याऐवजी दावा ग्रामसभेकडे पुनर्विचारार्थ पाठवील.

(७) ग्रामसभेने आवश्यक कागदपत्रे आणि पुराव्यांसह दाव्याची शिफारस करणारा जो ठराव संमत केला असेल तो आणि उपविभाग स्तरीय समितीने फेरबदलांसह अथवा फेरबदलांशिवाय कायम केला असेल मात्र जिल्हा स्तरीय समितीने मान्य केला नसेल अशा प्रकरणी, जिल्हा स्तरीय समिती यथास्थिती ग्रामसभा किंवा उपविभाग स्तरीय समिती यांच्या शिफारशी न स्वीकारण्याबाबतची सविस्तर कारणे लेखी स्वरुपात नोंदवील आणि जिल्हास्तरीय समिती या सदर कारणांसह आदेशाची एक प्रत यथास्थिति दावेदार किंवा ग्रामसभा किंवा समूह यांना उपलब्ध करुन देईल.

(८) कलम ३ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मान्यता देण्यात करण्यात आलेल्या स्वतःच्या कसण्याकरिताचे वनहक्क हे शेती पूरक बाबींसाठी उपयोगात आणल्या जात असलेल्या वनजमिनींसह जसे, जनावरे ठेवणे, उफाणणे आणि इतर कापणी पश्चात कार्यवाही, चक्री पध्दतीने पडीक, झाड पिके आणि उत्पादनांची साठवण यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत असतील.

(९) या नियमाच्या जोडपत्र दोन, तीन व चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे हक्क निश्चित करण्याची आणि मालकी हक्क प्रदान करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, महसूल आणि वनविभाग अशा प्रकारे निहित करण्यात आलेल्या वनजमिनींचा अंतिम नकाशा तयार करील आणि संबंधित प्राधिकारी अशा प्रकारे निहित करण्यात आलेले वनहक्क संबंधित राज्याच्या कायदयानुसार अभिलेखे अद्ययावत करण्यासाठी विनिर्दिष्ट केले कालमर्यादेत किंवा ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत, यापैकी जे अगोदर असेल, त्या कालावधी मध्ये यथास्थिति महसूल आणि वन अभिलेखामध्ये समाविष्ट करतील.

(१०) उपविभागीय स्तरीय समिती किंवा जिल्हास्तरीय समिती यांचा सर्व निर्णयात, ज्यामध्ये ग्रामसभेचे निर्णय किंवा उपविभागीय स्तर समितीच्या शिफारशी यांमध्ये फेरबदल अथवा फेटाळणे यांचा समावशे असेल त्या सर्व अथवा यथास्थिती फेरबदल फेटाळण्याची सविस्तर कारणे नमूद केलेली असतील.

परंतू, कोणत्याही दाव्यांची शिफारस करणे अथवा ते फेटाळणे हे केवळ काही तात्रिक अथवा प्रक्रियात्मक कारणांसाठी करण्यात येणार नाहीत.

परंतू, आणखी असे की, तालुका अथवा पंचायत अथवा वन बीट अथवा परिक्षेत्र स्तरावरील कोणत्याही समितीस (ग्रामसभा किंवा वनहक्क समिती सोडून) अथवा कोणत्याही श्रेणीतील कोणत्याही वैयक्तिक अधिकाऱ्यांस वनहक्कावरील कोणतेही दावे स्वीकारणे अथवा नाकारणे, त्यात फ्फ़ेरबदल करणे किंवा कोणत्याही दाव्यावर निर्णय घेणे याबाबतचे अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

(११) उपविभागीय स्तरीय समिती अथवा जिल्हास्तरीय समिती दाव्यांवर निर्णय घेतांना नियम १३ मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेले पुरावे विचारात घेईल आणि दाव्याच्या विचारार्थ कोणत्याही विशिष्ट प्रकाराच्या कागदपत्रांचा आग्रह करणार नाही.

**स्पष्टीकरण :** १. दंडाच्या पावत्या, अतिक्रमण केलेल्या यादया, प्राथमिक अपराधाचा अहवाल, वन जमाबंदी अहवाल आणि तशाच प्रकारची कागदपत्रे, मग ती कोणत्याही नावाने ओळखली जाणारी असो पूर्वीच्या कार्यालयीन प्रक्रियेमुळे अथवा ती नसल्यामुळे तयार झालेली आहेत, ती कोणतेही दावे नाकारण्याचे एकमेव कारण असणार नाहीत.

२. उपग्रहावरुन घेतलेली छायाचित्रे आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर हा इतर प्रकारच्या पुराव्यांना पूरक राहील आणि त्यांचा विचार यांच्या ऐवजीचा पुरावा म्हणून करता येणार नाही.

**१२ख. सामुहिक वनहक्क दावे मान्य करण्याची प्रक्रिया :–**

१) जिल्हास्तरीय समिती वनहक्क कायदयाच्या कलम ३ च्या पोटकलम १ च्या खंड (ङ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे वननिवासीमधील विशेषतः असुरक्षित जमाती समुहांची विशेष असुरक्षितता विचारात घेऊन याची सुनिश्चिती करील की, संबंधित विशेषतः असुरक्षित जमाती समुहांच्या पारंपारिक संस्था यांच्याशी विचार विनिमय करुन त्यांचे वसतिस्थानांचे अधिकारी मिळालेले आहेत आणि त्यांचे ते दावे हे त्यांच्या ग्रामसभांचे अस्थायी स्वरुप विचारात घेऊन जेथे आवश्यक तेथे त्यांच्या वसतिस्थानांच्या अधिकारांकरिताचे दावे म्हणून संबंधित ग्रामसभेपुढे सादर करण्यात येतील.

२) जिल्हास्तरीय समिती कलम ३ च्या पोटकलम (एक) च्या खंड (घ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे गुरे चारणारा समुदाय, फिरस्ते आणि भटक्या समुहांचे दावे संबंधित ग्रामसभेपुढे सादर होणे सुकर करेल.

३) जिल्हास्तरीय समिती याची सुनिश्चिती करेल की, सर्व गावांमधील वननिवासींचे कलम ३च्या पोटकलम (१) च्या खंड (झ) शी संबंधित कोणत्याही सामुहिक वनसंपत्तीचे संरक्षण, पुनर्निर्माण किंवा संवर्धन किंवा व्यवस्थापन, जे वननिवासी निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरित्या संरक्षण आणि संवर्धन करण्याकरिता आहेत, असे दावे मान्य करण्यात आले आहेत आणि हक्क देण्यात आले आहेत.

४) एखादया गावामध्ये कोणत्याही प्रकारचे सामुहिक वन संसाधनाचे हक्क मान्य करण्यात येणार नाहीत तेथे त्यांची कारणे जिल्हास्तरीय समितीच्या सचिवांकडून नमूद करण्यात येतील.

५) कलम ३ च्या खंड (ज) मधील वनगावे, अभिलेखित केलेली नसेल अशी वसाहत यांच्या रुपांतरणामध्ये शाळा, आरोग्य सुविधा आणि सार्वजनिक ठिकाणे यांसारख्या सध्याच्या तसेच भविष्यातील सार्वजनिक उपयोगासाठी लागणाऱ्या जमिनीसह

गावाच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये होणाऱ्या प्रत्यक्षात वापरलेली जमिनी, याचा समावेश असेल.

१२. **उक्त नियमांच्या नियम १३ च्या उपनियम (२) मध्ये**

(एक) ''सामूहिक वनहक्क'' या ऐवजी ''सामूहिक वनसंसाधन'' असे शब्द दाखल करण्यात येतील.''

(दोन) खंड (ग) नंतर पुढील खंडाचा समावेश करण्यात येईल ते असे–

(घ) शासकीय अभिलेख किंवा संरक्षित वन किंवा गोचर किंवा गावांची इतर सार्वजनिक जमीन, निस्तारी वन, यासारखे सध्याच्या राखीव वनाचे असे पूर्वीचे वर्गीकरण

(ङ) पारंपारिक शेतीची पूर्वीची किंवा सध्याची पध्दत.

१३. **उक्त नियमाच्या नियम १५ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल तो याप्रमाणे, ''१६. वनहक्क दावे धारकांना दावे मंजूरी नंतरचे सहाय्य आणि सहयोग.''**

राज्य शासन वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांच्या उन्नतीसाठी त्यांच्या विभागांमार्फत विशेषतः आदिवासी आणि समाज कल्याण, पर्यावरण आणि वन, महसूल, ग्रामविकास, पंयाचती राज आणि इतर विभाग यांचेमार्फत या गोष्टींची सुनिश्चिती करेल की, शासनाच्या सर्व योजना जमीन सुधार, जमीनीची उत्पादन क्षमता, मुलभूत सुविधा आणि इतर उपजीविकेशी संबंधित उपाययोजनांसह या अशा दावेदारांना आणि ज्यांचे हक्क या कायदयानुसार मान्य करण्यात आणि निहित करण्यात आले आहेत, अशा समूहांना, पुरविण्यात येत आहेत.''

१४. सदर नियमांच्या जोडपत्र–एक मध्ये नमुना ख नंतर खालील नमुना समाविष्ट करण्यात यावा, तो असा–

**नमुना – ग**

**सामुदायिक वन संसाधन हक्कासाठी दाव्याचा नमुना**

**(अधिनियम कलम ३(१) (झ) आणि नियम ११ (१) आणि ४ (क) पहा)**

१. गाव/ग्रामसभा:

२. ग्रामपंचायत :

३. तहसील/तालुका :

४. जिल्हा :

५. ग्रामसभा सदस्यांची नावे (अनुसूचित जमाती / इतर पारंपरिक वननिवासी याबाबतची स्थिती प्रत्येक सदस्याच्या नावासमोर दर्शविणारे स्वतंत्र प्रपत्र सोबत जोडावे.)

दावा दाखल करण्यासाठी अनुसूचित जमाती / इतर पारंपरिक वननिवासी यांची थोडी उपस्थितीही दावा दाखल करण्यासाठी पुरेशी आहे.

आम्ही, खाली स्वाक्षरी करणारे या ग्रामसभेचे रहिवासी असा ठराव करतो की, खाली नमूद आणि सोबतच्या नकाशात दर्शविलेले क्षेत्र हे आमच्या सामुहिक वन संसाधनांचे आहे, ज्यावर आम्ही कलम ३(१) (झ) नुसार आमच्या वनहक्कांना मान्यता देण्याचा दावा करीत आहोत.

(सामुहिक वन संसाधनाचा नकाशा सोबत जोडण्यात यावा, ज्यामध्ये स्थान, गावाच्या पारंपरिक किंवा रुढीजन्य सीमांच्या आतील भूमि चिन्ह किंवा गुराखी समूहांच्या बाबतीत कुरणांचा हंगामी वापर जे सदर समूहास पारंपरिकरित्या उपलब्ध आहेत, आणि जे ते निरंतर वापरासाठी पारंपरिकरित्या संरक्षित, पुनर्जिवित, संवर्धित आणि व्यवस्थापित करीत आहेत. या सीमा सध्याच्या कायदेशीर सीमांशी मिळत्या जुळत्या असणे आवश्यक नाही याची कृपया नोंद घ्यावी.)

६. खसरा/कक्ष संख्या (संख्यांना) काही असल्यास आणि माहिती असल्यास :

७. सीमांना लागून असलेली गावे :

(i)
(ii)
(iii)

(यामध्ये इतर काही गावांबरोबर संसाधन आणि जबाबदारी विभागण्या संबंधीची माहिती समाविष्ट केली जाऊ शकते.)

८. पुष्टीदाखल पुराव्यांची यादी (कृपया नियम १३ पहा) दावेदार

(दावेदारां) चा / चे स्वाक्षरी / अंगठा

१५. सदर नियमांच्या जोडपत्र–तीन नंतर खालील जोडपत्र समाविष्ट करण्यात यावे, तो असा–

**जोडपत्र–चार**

**सामूहिक वन संसाधनांचे हक्कपत्र**
**(नियम ८ (झ) पहा)**

१. गाव/ग्रामसभा:

२. ग्रामपंचायत :

३. तहसील/तालुका :

४. जिल्हा:

५. अनुसूचित जमाती/इतर पारंपरिक वननिवासी अनुसूचित जमाती समूह व इतर पारंपरिक वननिवासी समुह / दोन्ही

६. प्रमुख भूमि चिन्हाने आणि खसरा / कक्ष क्रमांकासह पारंपरिक सीमांसह सीमांचे वर्णन.

उक्त क्षेत्रात या समूहांना अधिनियमाच्या कलम ३ पोटकलम (१) खंड (झ) नुसार निरंतर वापरासाठी या (नाव नमूद करावे) सामूहिक वन संसाधनाचे ज्याचे ते पारंपरिकरित्या संवर्धन आणि संरक्षण करीत आहे त्यांना त्याबाबत संरक्षण, पुनर्जिवन, परिरक्षण आणि व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम व त्या अंतर्गत तयार केलेले नियम या मधील अटी व्यतिरिक्त इतर अटी या हक्कांवर लादता येणार नाहीत.

आम्ही खाली स्वाक्षरी करणारे, शासनासाठी आणि शासनाच्या वतीने उपरोक्त नमूद ग्रामसभा/समुह (समूहांना) देण्यात येणाऱ्या हक्कपत्रामध्ये नमूद सामूहिक वन संसाधनांचे हक्क (नाव नमूद केल्याप्रमाणे आणि नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत, परिमाणापर्यंत, क्षेत्रापर्यंत यापैकी जे लागू असेल ते) देणे सुनिश्चित करित आहोत.

**विभागीय वन अधिकारी/उपवनसंरक्षक** **जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी**

**जिल्हाधिकारी/उपायुक्त.**

## जोडपत्र – पाच

## त्रैमासिक अहवाल सादर करण्याचे प्रारूप

## (नियम १० (ग) पहा)

| | | |
|---|---|---|
| १. | राज्याचे नाव | |
| २. | दाव्यांची स्थिती | |
| क) | वैयक्तिक हक्क | |
| | ✻ दाखल झालेले | |
| | ✻ स्वीकारलेले | |
| | ✻ अमान्य केलेले | |
| | ✻ प्रलंबित | |
| | ✻ अमान्य झाल्याची कारणे, उदाहरणासह | |
| | ✻ सुचविलेले सुधारात्मक उपाय | |
| | ✻ इतर निरीक्षणे | |
| | ✻ वन क्षेत्राची व्याप्ती (हेक्टर मध्ये) | |
| | ✻ अधिनियमाच्या कलम ३(१) (क) अन्वये वन आणि महसूल अभिलेखात अद्ययावत नोंदी करण्याची स्थिती (हेक्टर मध्ये) | |
| ख) | सामुहिक वनहक्क | |
| | ✻ दाखल झालेले | |
| | ✻ स्वीकारलेले | |
| | ✻ अमान्य केलेले | |
| | ✻ प्रलंबित | |
| | ✻ वन क्षेत्राची व्याप्ती (हेक्टर मध्ये) | |
| | ✻ अधिनियमाच्या कलम ३(१) (ख) ते ३(१) (ठ) अन्वये वन आणि महसूल अभिलेखात अद्ययावत नोंदी करण्याची स्थिती (हेक्टर मध्ये) | |
| | ✻ अमान्य झाल्याची कारणे उदाहरणासह | |
| | ✻ सुचविलेले सुधारात्मक उपाय | |
| | ✻ इतर निरीक्षणे | |
| ग) | व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या सामूहिक वन संसाधनांचा तपशील आणि कोणाद्वारे | |
| घ) | चांगल्या उल्लेखनीय बाबी (काही असल्यास) | |
| ङ) | अधिनियमाच्या कलम ३(२) अन्वये खुले केलेले क्षेत्र | |
| च) | इतर काही शेरे | |

**अध्यक्ष**
**राज्यस्तरीय संनियंत्रण समिती**

**सदस्य सचिव**
**राज्यस्तरीय संनियंत्रण समिती**

टिप : मूळ नियम, भारताचे राजपत्र, असाधारण भाग दोन, खंड ३ उपखंड (एक) मध्ये क्र. जी. एस. आर. १(ई) दि. १ जानेवारी, २००८ द्वारे प्रसिध्द झाले आहेत

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ अंतर्गत सामुहिक वनहक्कांचे संवर्धन आणि व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः वहका–२०१७/प्र.क्र.७७/का–१४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२
दिनांक:– ६ जुलै, २०१७.

वाचा :– १) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२.

२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः वहका–२०१४/प्र.क्र.६६/का.१४, दिनांक २४ जून, २०१५

३) जन जाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. २३०११/१६/२०१५–ऋछअ, दिनांक २३ एप्रिल, २०१५

**शासन परिपत्रक :–**

१. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वतःच्या उपजीविकेकरिता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क; निस्तार सारखे हक्क; गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे; निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

२. प्रस्तुत अधिनियमाच्या कलम ५ आणि कलम ३ (१) (झ) नुसार अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वन निवासी यांना ‘निंरतर वापर करण्यासाठी पारंपरिकरित्या संरक्षण व संवर्धन करण्यात

आलेल्या कोणत्याही सामाजिक वन–स्रोतांचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन किंवा व्यवस्थापन करण्याचा हक्क‘ प्रदान करण्यात आला आहे. अनुसुचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८ च्या नियम ४ (१) (ङ) अन्वये ग्रामसभा वनहक्क अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदी अंमलात आणण्याच्या दृष्टीने, वन्यजीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी आपल्या सदस्यांमधून गठीत करु शकेल. सदर वन हक्क नियमाच्या नियम ४(१) (च) नुसार उक्त नियम ४ (१) (ङ) अंतर्गत गठीत समितीला अनुसूचित जमातीचे वननिवासी व इतर पारंपरिक वननिवासी यांच्या फ़ायद्यासाठी अशा सामूहिक वनसंपत्तीचे निरंतर व समसमान व्यवस्थापन करण्यासाठी सामूहिक वनसंपत्तीचे संवर्धन करण्याची व तिचे व्यवस्थापन करण्याची योजना तयार करणाऱ्या आणि वन विभागाच्या सूक्ष्म योजना किंवा चालू योजना किंवा व्यवस्थापन योजनांबरोबर अशा संवर्धन व व्यवस्थापन योजनांचे आवश्यक वाटेल अशा फ़ेरबदलांनिशी एकत्रीकरण करण्याचे अधिकार असतील. यानुसार, जन जाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी त्यांच्या दिनांक २३ एप्रिल २०१५ च्या पत्रान्वये वन हक्क कायद्याच्या कलम १२ अंतर्गत सामुहिक वन संसाधनाच्या मान्यता आणि अधिनस्त ठेवणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे याबाबतची मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. त्यानुषंगाने सामुहिक वनहक्कांचे संवर्धन आणि व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे सविस्तर मार्गदर्शक सूचना विहीत करण्यांत येत आहेत:–

(i) वन हक्क अधिनियम, २००६ च्या कलम ३ (१) (झ) आणि कलम ५ नुसार, सामूहिक वन हक्कांचे संरक्षण, पुनर्निर्माण किंवा संवर्धन किंवा व्यवस्थापन याबाबतचे प्राधिकार ग्रामसभा तिच्या सदस्यांची नियम ४(१) (ङ) अंतर्गत वन्यजीव आणि जैवविविधता यांचे सरंक्षणासाठी गठीत समितीला आहेत. ग्रामसभा म्हणजे वन हक्क अधिनियम २००६ च्या कलम २ (छ) आणि २ (त) मध्ये दिलेल्या व्याखेप्रमाणे आहे.

(ii) प्रत्येक ग्रामसभा तिच्या सदस्यांना व्यवस्थित समजेल अशा सोप्या स्वरुपात वन हक्क संवर्धन आणि व्यवस्थापन आराखडा तयार करु शकेल.

(iii) वन हक्क व्यवस्थापन आराखड्यामध्ये जंगलात प्रवेश, जंगलाचा वापर आणि जंगलाचे संवर्धन याबाबतच्या नियम आणि नियमनाचा समावेश असेल.

(iv) ग्रामसभा आणि वन हक्क नियम ४ (१) (ङ) अंतर्गत समिती वन विभागाच्या सूक्ष्म योजना किंवा चालू योजना किंवा व्यवस्थापन योजनांना आवश्यक वाटेल अशा फ़ेरबदलांनिशी ग्रामसभेने मंजूर केलेल्या संवर्धन व व्यवस्थापन योजनांशी एकत्रीकरण करण्यासाठी प्राधिकृत असेल.

(v) उपरोक्त (ii), (ii) आणि (iv) प्रमाणे ग्रामसभेने घेतलेले सर्व निर्णय अंतिम असतील आणि कोणतेही प्राधिकरण वा कोणतीही व्यक्ती यांना या निर्णयांमध्ये बदल करण्याचे अधिकार नसतील.

(vi) सामूहिक वन संसाधनांच्या संवर्धन आणि व्यवस्थापन आराखड्याबाबतचा सूचक स्वरुपातील नमूना ‘परिशिष्ट– अ‘ प्रमाणे आहे. मात्र, अधिनियमाच्या कलम १२ अनुसार

जनजाती कार्य मंत्रालयाच्या दिनांक २३ एप्रिल २०१५ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचनेनुसार प्रत्येक ग्रामसभा सामूहिक वन संसाधनांच्या संवर्धन आणि व्यवस्थापनाचा सोपा आराखडा स्वतः तयार करु शकेल.

(vii) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ अन्वये वनांचे संरक्षण, संवर्धन, व्यवस्थापन आणि पुर्ननिर्माणाची जबाबदारी ग्रामसभांना देण्यात आली असल्यामुळे, वनांच्या सरंक्षण, पुर्ननिर्माण आणि व्यवस्थापनांच्या संदर्भातच्या सर्व निर्णयांबाबत ग्रामसभेची संमती घेण्यात यावी.

(viii) सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी ग्रामसभांच्या व्यवस्थापन आराखड्याच्या अधिकारांबाबत ग्रामसभांना माहिती होईल याबाबत खात्री करावी तसेच ग्रामसभांना व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत उत्तेजन द्यावे.

(ix) ग्रामसभेने तयार केलेला व्यवस्थापन आराखडा सर्व संबंधितांना बंधनकारक असेल.

३. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी 'नोडल एजन्सी' म्हणून याप्रकरणी वेळोवेळी आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०६२११२५८१०४७२४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ङ्राळझरपीं त्रेर्भरिश्रीरे उ्हेज्ञश उ्श नां ग्ल ग, (ल. गो. ढोके) उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव

२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव

३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

४. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

५. सचिव, (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

६. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

७. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

८. प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर

९. सर्व विभागीय आयुक्त,

१०. सर्व जिल्हाधिकारी.

११. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती,

१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.

१३. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

१४. सर्व तालुका सामुहिक वनहक्क व्यवस्थापक

१५. सर्व जिल्हा सामुहिक वनहक्क व्यवस्थापक

१६. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या. अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१७. निवड नस्ती. (का.१४) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**(आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र. वहका–२०१७/प्र.क्र.७७/का–१४, दि. ६ जुलै, २०१७) सोबतचे**

**''परिशिष्ट–अ''**

**सामूहिक वन संसाधने व्यवस्थापन आराखडा आणि ठरावाचा आदर्श नमुना**

(टीप : हा एक सूचक स्वरुपाचा व्यवस्थापन आराखडा नमुना आहे. मात्र, प्रत्येक ग्रामसभा आपआपल्या स्तरावर साध्या नमुन्यात स्वतःचा व्यवस्थापन आराखडा बनवू शकेल)

ग्रामसभेचे नावः

ग्राम पंचायतीचे नावः

तालुक्याचे नावः

जिल्हाः

दिनांकः

**ठरावः**

क.) असे घोषित करण्यात येते की, यासोबत जोडलेल्या व्यवस्थापन आराखड्यावर चर्चा झाली आहे आणि सदर व्यवस्थापन आराखडा आजपासून ............वर्षे/महिने कालावधीसाठी स्वीकारण्यात आला आहे.

ख.) असेही घोषित करण्यात येते की, सोबतचा आराखडा वन विभागाच्या आराखडा/सूक्ष्म आराखडा/चालू आराखडा (Management Plan / Micro Plan / Working Plan) यांच्याशी खालीलप्रमाणे सुसंगत राहिलः

i) सोबतचा व्यवस्थापन आराखडा यापुढे वन विभागाच्या वनव्यवस्थापन आराखडा/सूक्ष्म आराखडा/चालू आराखडा यामध्ये अंतर्भूत असेल.

ii) वन विभागाच्या व्यवस्थापन आराखडा/चालू आराखडा/सूक्ष्म आराखडा यातील या सामूहिक वन संसाधन व्यवस्थापन आराखड्याशी सुसंगत नसलेला भाग यापुढे वगळण्यात आला आहे असे समजण्यात येईल. वन विभागाने विनाविलंब याबाबत खात्री करावी.

ग.) सामूहिक वन संसाधने व्यवस्थापन समिती (किंवा ग्रामसेवक) यांना या आराखड्याची प्रत स्थानिक जिल्हा वन संरक्षक यांना पाठविण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

घ.) याद्वारे असेही घोषित करण्यात येते की, ही ग्रामसभा जेंव्हा गरज भासेल तेंव्हा हा व्यवस्थापन आराखडा सुधारीत करणे, तसेच वन विभागाच्या सुक्ष्म/चालू आराखड्यातील भाग सुधारीत करणे याबाबतचा हक्क राखून ठेवत आहे.

च.) यानंतर असेही घोषित करण्यात येते की, कोणीही या सामूहिक वनहक्क क्षेत्रामध्ये व्यवस्थापन, वृक्षारोपण, वृक्षतोड आणि वनांचे पुनरुज्जीवन यासारखे उपक्रम या ग्रामसभेच्या पूर्व सूचित परवानगीशिवाय घेणार नाहीत.

